Library
11-5-04

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


१ ● संपादकीय
३ ● विनाशक भावना
७ ● लोकशाही हीच पाकिस्तानची मूलभूत गरज
११ ● मुक्त व्यापारात शेतीला उतरती कळा
१४ ● भारतातील विज्ञान-संशोधन आणि संपत्तीची निर्मिती
१७ ● आयुर्वेदः वनौषधींचा शोध, दर्जा व बाजारपेठ
२० ● सामान्यांची राणी
२३ ● अफगाणिस्तानः बामिया, तालिबान आणि आता...
२६ ● सहकारी चळवळीचे बदलते संदर्भ
३१ ● शांततेच्या पाऊलखुणा (स्त्रियांचे अधिवेशन)
३३ ● जगाच्या पाठीवर (इस्लामिक बँकिंग)
३५ ● कालप्रवाहात......
● अर्थबोधपत्रिका पुरवणी
(वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेविषयी)


खंड ३ : अंक २ मे २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**वर्गणीसाठी पत्ता :**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ३ (अंक २) मे २००४**
**संपादक - रमेश पानसे**
**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**
◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले** जाते. ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात लेखांची विविधता वाचकांना जाणवेल. अलीकडच्या काळातील काही घटनांशी संबंध सांगणारे अफगाणिस्तान किंवा मुक्त व्यापार व शेती असे लेख वाचकांना त्या त्या विषयात आणखी एक पाऊल पुढे टाकायला मदत करतील; तर इस्लामिक बँकिंग किंवा आयुर्वेदासंबंधीचे लेख जगाचे पाऊल कुठे पुढे पडते आहे याची काहीशी कल्पना देतील. 'न्युरेमबर्ग आंतरराष्ट्रीय मानवाधिकार पुरस्कार' प्राप्त करणारे पाकिस्तानास्थित विचारवंत आय. ए. रेहमान यांनी पुरस्कार प्रदान सोहळ्यात व्यक्त केलेले विचार हे कुठेतरी भारतातील विचारवंतांच्या विचारांशी जुळणारे आहेत, अशी साक्ष पटेल. पाकिस्तानमधील लोकशाहीचा त्यांचा आग्रहही सामान्य भारतीयांच्या मनांशी तार जुळणारा असा आहे.

अलीकडे, भावनिक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात बरेच विचार, मानसशास्त्रातील संशोधक, प्रकट करीत आहेत. 'विनाशक भावनां'चा व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरांवरील तसेच स्थानिकपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत, एक चिंता करावी असा उद्रेक आढळून येत आहे. आणि या उद्रेकाची धार्मिकतेशी नाळ जोडलेली आहे, याचा प्रत्ययही येत आहे. अशावेळी एका वेगळ्या बौद्धिक चर्चेसाठी भावनिक बुद्धिमत्ता या विषयाचे तज्ज्ञ डॉ. डॅनियल गोलमन व इतर मानसशास्त्रज्ञ आणि बौद्ध धर्मगुरू दलाई लामा एकत्र येतात आणि धर्माची शास्त्रीय चिकित्सा करतात, ही उपयुक्त बाब आहे. वाचकांना या घटनेची ओळखही या अंकातील एका लेखातून देण्यात आलेली आहे. 'सामान्यांची राणी' सुद्धा वाचकांना काही वेगळे सांगून जाईल, अशी आशा आहे. ■■

## 'फीलिंग गुड'

विविध संस्कृती व भावना यांच्यातही काही परस्परसंबंध आहे का, याचा शोध मानसशास्त्रज्ञ घेत आहेत. त्यांना असे आढळले की, अमेरिकन संस्कृतीत आत्मसन्मानाला महत्त्व आहे. एखाद्या व्यक्तीत आत्मसन्मानाची भावना कमी असेल तर तेथे ते काळजीचे समजले जाते, तर याउलट आशियातील संस्कृतीत आत्मसन्मानाची भावना तीव्र असेल तर ते काळजीचे समजले जाते. 'मी माझ्या स्वत:बद्दल सकारात्मक विचार करतो,' हे अमेरिकेतील लोकांसाठी कौतुकाचे व अभिमानाचे समजले जाते. ज्यांची आत्मसन्मानाची भावना तीव्र असते, ते अशा वाक्यांकडे आपला होकारार्थी कल दर्शवितात. *(संदर्भ - डिस्ट्रक्टिव्ह इमोशन्स - डॅनियल गोलमन)*

# वाचकांचा प्रतिसाद

अंकाबद्दल प्रतिक्रिया कळविण्याबाबत आपण वारंवार केलेल्या आवाहनानुसार असे कळवावेसे वाटते की विषयांची विविधता, नेटकेपणा व आशय या सर्वच दृष्टीने लेख सहजसुंदर वाटतात व ते मराठीतून असतात हे अभिनंदनीय आहे. विज्ञान विषयाशी संबंधित व्यवसाय राहिल्याने, विविध तऱ्हेची अशी माहिती हे बुद्धीला खाद्यच वाटते. विचार करण्यास प्रवृत्त करते. यापेक्षा दुसरी पावती काय द्यावी ? वाचक कुटुंबातील एक या भूमिकेतून काही लेख मैत्रिणींना वाचून दाखवले. उदाहरणार्थ - जपानमधील कुटुंबे (एप्रिल ०३), व्यापार संघटना व लघुउद्योग (मे ०३), युद्ध आणि शास्त्रज्ञ (जून ०३), रचनात्मक शिक्षण (ऑगस्ट ०३), आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्त्री-पुरुष असमानता (सप्टेंबर ०३). आपल्या अंकातील प्रत्येक लेख विचार करण्यासारखा वाटतो. *सिंधू जोशी, गोवंडी, मुंबई.*

अर्थबोधपत्रिका हे मासिक प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेतील घटनांचे ज्ञान मिळविण्यासाठी उत्तम आहे. हे मासिक मराठीतून आहे याचे विशेष कौतुक आहे.

*रसिका जोशी, अंबरनाथ*

आपले अंक मला निश्चितच आवडतात. मी ज्यात प्रयोगशील आहे अशा पुढील दोन विषयांवर लेख अथवा वैयक्तिक मार्गदर्शन मिळावे अशी अपेक्षा आहे; (१) रेकी व वैद्यकशास्त्र आणि (२) बहुश्रेणी शिक्षण प्रणाली. अंकाचे ठळक अक्षरात नाव व छोटेखानी रूप व रेल्वे प्रवासात समोरच्या आसनावरील प्रवाशाला आकर्षित करून घेत आले आहे. *डॉ. श्यामकांत मोडक, डहाणू.*

आपला अंक निश्चितच चांगला असतो. संदर्भ म्हणून वापरण्यासाठी सदर अंक मी संग्रही ठेवतो आहे. मी अर्थबोधपत्रिकेच्या कुटुंबातीलच आहे व त्यात राहणे मला आवडेल. पुण्याला इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या सभागृहात महाराष्ट्रातील DIET च्या प्राचार्यांची टेलिकॉन्फरन्स झाली. त्यात मी आवर्जून अर्थबोधपत्रिकेसारख्या काही मासिकांची शिफारस केली. *अरुण रंधे, उमरेड*

मार्च २००४ च्या अंकातील अणुबॉंबविषयक लेख वाचले. अण्वस्त्रांच्या निर्मितीचे तंत्रज्ञान झाकून ठेवण्याचा प्रयत्न आजपर्यंत सफल झालेला नाही व यापुढेही सफल होणार नाही, असे मला वाटते. प्रत्येक राष्ट्राच्या जनतेला असेच

*(पान क्रमांक २४ व २५ वर पाहावे)*

सामाजिक

# विनाशक भावना

उपयोजित मानसशास्त्राच्या क्षेत्रातील एक तज्ज्ञ डॅनियल गोलमन यांची या क्षेत्रातील अभ्यासावर आधारित अशी बारा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'इमोशनल इंटलिजन्स' (१९९५) हे पुस्तक आणि त्यापाठोपाठ 'हिलिंग इमोशन्स' (१९९७) ही पुस्तके विश्वभर गाजली. त्यांनी संपादित केलेला 'डिस्ट्रक्टिव्ह इमोशन्स' हा दलाई लामा यांच्या समवेत केलेल्या चर्चांच्या संदर्भातील ग्रंथ अलीकडेच २००३ साली प्रसिद्ध झाला आहे. या चर्चा २००० साली 'धर्मशाला' (जिथे दलाई लामा यांचे वास्तव्य आहे,) येथे, म्हणजे भारतातच झाल्या आहेत. 'माईंड अँड लाईफ इन्स्टिट्यूट'ने या चर्चा घडवून आणल्या होत्या. भिन्न संस्कृतींमध्ये विचार-विनिमय घडवून आणणे, हेच या इन्स्टिट्यूटचे प्रमुख कार्य आहे. त्यामुळे दलाई लामा आणि इतर बौद्ध विद्वान आणि पाश्चिमात्य वैज्ञानिक नि तत्त्वज्ञानी यांच्यामध्ये असा संवाद, विशेषतः काही व्यापक सामाजिक प्रश्न समोर ठेवून, करण्यात आला.

समाजात, विचारी, बुद्धिवंत माणसेही अनेकदा क्रूर नि हिंसक कृत्यांना बळी का पडतात ? अशा विनाशक वर्तनात कोणती कारणे दडलेली असतात ? अशा प्रकारची येणारी उबळ नि त्यामागच्या भावना, कशाप्रकारे नियंत्रित होऊ शकतील ? आपण, स्वतःबरोबर आणि इतरांबरोबर शांततेने राहायला शिकू शकतो का ? विसाव्या शतकाने जाता जाता, आपल्यासमोर उभे केलेले हे प्रश्न आहेत. दिवसेंदिवस जातीय नि धर्मीय राजकारण, हे प्रश्न आणखी तीव्र करीत चालले आहे. अशावेळी भावनांच्या नियंत्रणाचीच समस्या आपल्यासमोर 'आ' वासून उभी राहिली आहे. या समस्येची उकल करण्यासाठी एका बाजूला, पाश्चात्य राष्ट्रांमधून मानसशास्त्र आणि मज्जाजीवशास्त्र, मानवी मेंदूचा शोध आणि बोध घेण्यात गुंतले आहे, तर दुसऱ्या बाजूला पौर्वात्य अध्यात्मशास्त्र तपासून पाहिले जात आहे. पौर्वात्य (विशेषतः बौद्ध) आणि पाश्चिमात्य ज्ञान आणि विज्ञान यांना एकत्र आणून विनाशक भावनांच्या उद्रेकाच्या कारणांचा वेध काही नेमकेपणाने घेण्याचा एक प्रयत्न, दलाई लामा यांच्याशी झालेल्या विद्वान शास्त्रज्ञांच्या चर्चांमधून करण्यात आला. दलाई लामा यांच्याशीच अशा शास्त्रीय चर्चांचा घाट का घालण्यात आला ?

तर, डॅनियल गोलमन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना असे दिसून आले की, बौद्ध तत्त्वज्ञान असे सांगते की, सर्व व्यक्तिगत असमाधान आणि व्यक्ती-व्यक्तींमधील संघर्ष हा मुख्यतः तीन 'भूमिकां'मधून उद्‌भवतो. एक, हांव, दोन, क्रोध आणि तीन भ्रम किंवा गैरसमज. बौद्ध धर्मात यांवर उताराही दिला आहे; आणि तो मानसशास्त्रीय स्वरूपाचा आहे, तसेच आजच्या मज्जाशास्त्राने त्याची शहानिशाही करता येते; सिद्धता पडताळून पाहता येते. कारण, आता अत्याधुनिक फोटो इमेजिंगच्या तंत्राने, शास्त्रज्ञ मंडळी, मेंदूमधील राग किंवा भीती यांचे वादळ शांत करणारी केंद्रे यांमध्ये, डोकावून पाहू लागली आहेत. त्यांना आता असेही आढळून आले आहे की, स्वतःचा शोध घेण्याचे जे, ध्यानधारणेसारखे उपक्रम आहेत ते, भावनांची स्थिरता निर्माण करण्यात उपयुक्त ठरतात; आपल्या प्रवृत्ती विधायक करू शकतात.

दलाई लामा यांच्याशी झालेल्या चर्चांचा साद्यंत वृत्तांत डॅनियल गोलमन यांनी 'डिस्ट्रक्टिव्ह इमोशन्स' (२००३) नावाने ग्रंथबद्ध केला आहे. या ग्रंथाला एक छोटेखानी नि नेटकी अशी प्रस्तावना, स्वतः दलाई लामा यांनी लिहिली आहे. ती आपल्याला निश्चितच अंतर्मुख करील अशी आहे.

दलाई लामा यांनी लिहिले आहे की, "बहुतांशी मानवी दुःखे किंवा भोग हे विनाशक भावनांमधून जन्म घेतात. उदाहरणार्थ, तिरस्कारापोटी हिंसा जन्म घेते तर हांव ही व्यसनाधीनतेत परावर्तित होते. अशा भावनातिरेकामुळे जी काही मानवी किंमत आपण मोजतो आहोत ती टाळणे आपली, म्हणजे इतरांची काळजी वाहणाऱ्यांची, मूलभूत जबाबदारी आहे. आणि दलाई लामा यांच्या मते, या कामात, बौद्ध धर्म आणि शास्त्रे यांना खूपसे योगदान देता येणार आहे. कारण, त्यांच्या मते, बौद्ध धर्म आणि विज्ञान हे जगाबद्दलचे परस्परविसंगत असे दृष्टिकोण नसून, उलट सत्याचा शोध घेण्याच्या दिशेने जाणारे वेगवेगळे दृष्टिकोण आहेत. बौद्ध शिकवणुकीतील वास्तवाचा शोध घ्यायला हवा आहे, आणि तो घेण्याच्या पद्धती विज्ञान देऊ शकते; वास्तविक बौद्ध धर्म आणि विज्ञान यांची उद्दिष्टे भिन्न आहेत, परंतु दोन्ही मार्गांनी जो सत्याचा शोध घेणे चालले आहे, त्याने आपले ज्ञान आणि आपली समज अधिक वाढू मात्र शकणार आहे.

विज्ञान नि बौद्धधर्म यांच्यात परस्परात देवाण-घेवाण होऊ शकेल अशी दलाई लामा यांची धारणा आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "आम्ही बौद्ध लोक विज्ञानाच्या मदतीने आमची जगाबद्दलची समज स्वच्छ करून घेऊ शकू; तसेच अशी अनेक

ज्ञानक्षेत्रे आहेत की ज्यांमध्ये बौद्धविचार विज्ञानाला खूप काही देऊ शकेल. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष मनाचे कार्य कसे चालते याविषयीचे एक अंतर्गत शास्त्र बौद्धधर्माने शेकडो वर्षे विकसीत करीत नेले आहे. त्याचा उपयोग, ज्ञानग्रहणाच्या नि मज्जाशास्त्राच्या संशोधकांना, तसेच भावनेविषयी अभ्यास करणारांना करवून घेता येईल.

"याउलट, बौद्धविचारालाही विज्ञानाकडून घेण्यासारखे आणखी काही आहे. मी अनेकदा म्हटले आहे की, विज्ञानाने जर बौद्धविचारातील काही तथ्ये, काही वास्तविके ही विसंवादी म्हणून सिद्ध केली तर बौद्ध विचारात त्यानुसार बदल करावा लागेल. वास्तवतेला धरून असणारा विचारच आपण स्वीकारला पाहिजे. संशोधनांती जर असे दिसून आले की, एखाद्या मुद्याबाबतच्या विज्ञानाच्या म्हणण्यात काही अर्थ आहे तर ते आपण स्वीकारले पाहिजे. अर्थात, एक महत्त्वाचा भेद मात्र केला पाहिजे. विज्ञानाला 'काय सापडले नाही' आणि 'काय 'नाही' असे सापडले आहे,' या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. विज्ञानाने जे अस्तित्वात नाही असे दाखवून दिले आहे, त्या सगळ्याचा स्वीकार, आपण ते अस्तित्वात नाही असे म्हणूनच केला पाहिजे. परंतु जे अजून विज्ञानाला अवगत झालेले नाही, ती मात्र वेगळीच बाब आहे. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष जाणीव ही काय चीज आहे, हे विज्ञानाला सांगता आलेले नाही. मानवासहित ज्ञानग्रहण करणाऱ्या सर्व प्राण्यांनी जाणीवेचा अनुभव वर्षानुवर्षे घेतलेला आहे. तरीही जाणीवेचे नेमके स्वरूप काय आहे, तिचे कार्य कसे चालते याचे आकलन अजूनपर्यंत तरी आपल्याला झालेले नाही.

"विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांची प्रगती खूपच झाली आहे. तरीही पूर्वीच्या धर्मांप्रमाणेच आजच्या विज्ञानालाही कित्येक प्रश्नांची उत्तरे सापडलेली नाहीत. मात्र, अंतर्गत विकासाच्या आशयाला दुर्लक्षून, आपण भौतिक प्रगतीकडे जितके अधिक जाऊ तितकी नैतिक मूल्यांची अधिक घसरण होत जाणार आहे. त्यातून दीर्घकाल असमाधान अनुभवाला येणार आहे; तिथे न्याय्यतेला नि प्रामाणिकपणाला काही किंमत राहणार नाही; मात्र दुर्बल लोकांना अधिक सोसावे लागणार आहे; आणि अशा अ-न्याय्यतेपोटी उद्भवणाऱ्या उद्रेकातून सारा समाजच भरडला जाणार आहे.

"अशा विज्ञान-तंत्रज्ञानाच्या घोडदौडीत, आपल्याला मानवतेची जाणीव करून देण्यात धर्म नि अध्यात्म यांना खूप मोठे स्थान आहे. आपल्याला वैज्ञानिक, भौतिक प्रगती आणि अंतर्गत विकासातून येणारी जबाबदारीची जाणीव या दोन्हींचा मेळ घालता आला पाहिजे.

"आज घडीला निर्माण झालेल्या विनाशक भावनांच्या संदर्भात, बौद्ध धर्म विज्ञानाला काही सांगू इच्छितो. आपल्या जीवनातील अशा विनाशक भावना नाहीशा करणे हेच मुळी या धर्माचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट समोर ठेवून, अनेक सैद्धांतिक अंतर्दृष्टी नि व्यावहारिक पद्धती विकसित केल्या आहेत. त्या जर वैज्ञानिक निकषांवर उपयुक्त ठरत असतील तर मग त्याचे सार्वत्रिकीकरण करायला काहीच हरकत नाही."

दलाई लामा यांनी या प्रस्तावनेत विज्ञान आणि अध्यात्म यांची जोडणी करण्याची संकल्पना मांडताना, अध्यात्म हे विज्ञानाने तपासावे आणि विज्ञानाला अध्यात्माने मानवतेचा आशय पुरवावा, अशी अपेक्षा केली आहे. त्यांच्या वैज्ञानिकांशी झालेल्या चर्चांमध्ये, अनेक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला. उदाहरणार्थ, मानवी विनाशक भावनांचे, मानवी उत्क्रांतीत नेमके काय स्थान आहे ? त्यांचे मानवामधील अस्तित्व हे नैसर्गिकरीत्याच कोरलेले आहे काय ? या भावना वैश्विक आहेत की त्यांना सांस्कृतिक परिमाण आहे ? दयाबुद्धी ही देखील अशीच जन्मसिद्ध असेल तर तिचे संवर्धन करता येईल काय ?

या ग्रंथामध्ये अनेक वैज्ञानिकांनी नि अध्यात्मिक विद्वानांनी सादर केलेल्या निबंधांमधून, प्रत्यक्ष शालेय स्तरावरच, सामाजिक आणि भावनिक शिक्षणाचे काही उपक्रम राबविता येतील का ? याचाही विचार मांडला आहे. मुलांच्या मनात जाणीव जागृती, रागावर नियंत्रण आणि सहानुभूतीचे वागणे निर्माण करता येईल का ? आणि कसे ? विनाशक भावना हा जगापुढचा जागता विषय आहे. भविष्याकडे जाताना असे वर्तमानकालीन वास्तव बदलण्याची आकांक्षा आपण धरू शकतो का ? ■■

भावनाशील प्राणी म्हणून आपण, भावनांचा एक जाणीवपूर्वक घेतलेला अनुभव म्हणून विचार करीत असतो. पण जेंव्हा मेंदूमधील भावनांच्या स्थानाचा विचार करू लागतो, तेव्हा भावनात्मकता ही त्या व्यवस्थेतील केवळ एक बाजू आहे असे लक्षात येते. ती तशी मध्यवर्ती असते, असेही नाही. अर्थात, त्यामुळे आपला प्रेमाचा वा भीतीचा अनुभव खरा नसतो किंवा तो महत्त्वाचा नसतो असेही नाही. पण आपल्याला येणारा हा भावनांचा अनुभव कुठून, कसा येतो याचा शोध घ्यायचा असेल तर ती वेगळीच गोष्ट आहे. प्रेमिकाच्या दृष्टीने प्रेमाबाबतची एकमेव महत्त्वाची बाब म्हणजे प्रेमाची होणारी जाणीव. पण त्या जाणीवेचा शोध घेणाऱ्याच्या दृष्टिकोणातून, ती प्रेमभावनेची जाणीव तितकीशी महत्त्वाची नाही.

*(संदर्भ - द इमोशनल ब्रेन, पृष्ठ २०, लेखक - जोसेफ लि-डॉक्स)* ■■

राजकीय

# लोकशाही हीच पाकिस्तानची मूलभूत गरज

आंतरराष्ट्रीय पातळीवर, मानवाधिकारांसाठी मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'न्युरेमबर्ग आंतरराष्ट्रीय मानवाधिकार पुरस्कार' जाहीर करण्यात येतो. २००३ या वर्षी, हा पुरस्कार पाकिस्तानमधील मानवाधिकाराचे कार्यकर्ते व विचारवंत आय. ए. रेहमान आणि भारतातील टीस्टा सेतलवाड यांना संयुक्तरीत्या घोषित करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारताना रेहमान यांनी, पाकिस्तानमधील लोकशाहीविषयक गरजा व भारत-पाकिस्तान संबंध याबाबत काही मते व्यक्त केली. अलीकडे, गेले वर्षभर, भारत व पाकिस्तान यांच्यात, शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडविण्यासंबंधी जी काही राजकीय प्रक्रिया सुरू आहे, त्या पार्श्वभूमीवर रेहमान यांच्यासारख्या विचारवंताने व्यक्त केलेल्या मतांना फार महत्त्व आहे.

रेहमान म्हणतात, "आपण पुरातन सिंधू संस्कृतीचे वारसदार आहोत. फार पूर्वी या संस्कृतीने अनेक चांगले उच्चांक प्रस्थापित केलेले आहेत. पण त्यामानाने नवीन म्हणता येईल (म्हणजे फक्त ५६ वर्षांचा इतिहास असलेले) अशा पाकिस्तान या देशाचा मात्र याप्रकारे उच्चांक वाढविण्यामध्ये सहभाग नाही नि या वारसदारांच्या यादीतही त्याचे कुठेही नाव नाही. पाकिस्तानची स्थापना झाल्यापासून येथील नागरिक कोणत्या ना कोणत्या संघर्षात अडकलेले असून, दर दहा वर्षांनी येथे क्रांतीसदृश वातावरण तयार होते आणि अचानक ईश्वरी संकेत व्हावा तशी पाकिस्तानात लोकशाहीची स्थापना व्हावी, अशी त्यांची इच्छा या वातावरणातून उफाळून येताना दिसते. आजही येथे असाच संघर्ष चालू आहे. देशात लोकशाही प्रस्थापित होणे व नागरिकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळणे ही येथील नागरिकांसाठी मूलभूत व महत्त्वाची बाब आहे; कारण, त्याशिवाय पाकिस्तानच्या मताला काही किंमत मिळणार नाही. आणि त्याचवेळी पाकिस्तानच्या मतांना अधिकृत व कायदेशीरदृष्ट्या मान्यता मिळणार नाही. मानवाधिकार व शांतता यांच्याप्रती पाकिस्तानची दृष्टी कितीही उदार असली तरी लोकशाही मूल्ये मानणाऱ्या व जपणाऱ्या संस्था येथे नसल्यामुळे पाकिस्तानची ही दृष्टी कवडीमोलच ठरते. पाकिस्तानमधील नागरिकांची, लोकशाहीची मागणी व गरज आणि

त्यासाठी असलेली त्यांची बांधिलकी यांचे विकसित देशांनी कधीच कौतुक केलेले नाही वा त्याला उचलून धरलेले नाही. उलट, आपल्या क्षुल्लक राजकीय स्वार्थासाठी त्यांनी, पाकिस्तानमधील हुकुमशहा वा लष्करशहा यांच्यावरच भिस्त ठेवली. पाकिस्तानसारख्या देशातील समाजाला लोकशाहीची मुळातच गरज नाही आणि अशा समाजासाठी लष्करी राजवटच उपयोगी ठरेल, अशा प्रकारचा मतप्रवाहही कधीकधी आढळून येतो. अर्थात, अशी मते योग्य ठरत नाहीत; उलट, त्यामुळे काही समाजगट लोकशाहीसाठी पात्र आहेत तर काही अपात्र आहेत, या भूमिकेवरच शिक्कामोर्तब होते. असे असले तरी, पाकिस्तानातील नागरिकांची लोकशाहीची गरज ही महत्त्वाची असून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची दखल घेतली जावी, यावर मी माझ्या भाषणात भर देणार आहे.

''पाकिस्तानात एकाधिकाराला महत्त्व असून त्याचेच राज्य येथे चालते आणि लोकशाहीसंबंधीच्या तुरळक मागण्याही जेथे अल्पजीवी ठरतात, तेथे मानवाधिकारांचा उल्लेख वा संबंध किंवा संदर्भ हा देखील अव्यवहार्य ठरण्याची शक्यता आहे. मानवाधिकारांच्या निकषांचा विचार केला तर आपले प्रश्न फार मोठे व गंभीर आहेत. स्त्रियांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळालेले नाहीत किंबहुना कायद्याने मंजूर केलेले अधिकारही त्यांना मिळत नाहीत. त्यांच्यावरील हिंसाचाराची गोष्ट तर विचारायलाच नको. बालकामगारांचा प्रश्नही येथे आहे; अलीकडे मात्र या एका प्रश्नासंदर्भात थोडी जागरुकता निर्माण होताना दिसते आहे. पाकिस्तानात अजूनही राष्ट्रीय व धार्मिक अल्पसंख्याक यांच्यात भेदभाव केला जातो. कामगार वा कर्मचारी वर्गालाही त्यांचे अधिकार मिळत नाहीत. लोकांचे नागरी व राजकीय अधिकार हिरावून घेतले जातात व स्वातंत्र्य न देता त्यांचा छळ मात्र होतो.

''या सर्वांच्या मागे, पाकिस्तानमध्ये लोकशाही नाही, हे एक कारण आहे. दुसरे कारण असे की, या देशाने सुरूवातीपासून मान्य केलेल्या मूलभूत अधिकारांमध्येच त्रुटी आहेत. न्यायव्यवस्थेच्या अधिकारांचा संकोच येथे होताना दिसतोच. शिवाय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवाधिकारांकडेही फार मोठे दुर्लक्ष होते, त्यांच्याप्रती निष्ठा ठेवण्यात येत नाही. पाकिस्तान सरकारचा धर्माकडे असलेला कल, सरंजामशाहीला देण्यात आलेले महत्त्व, सरकारकडून नागरी समाजगटांकडे करण्यात येणारे दुर्लक्ष आणि राजकीय पक्ष व स्वेच्छाकार्य संस्था यांच्याप्रती असलेली शत्रुत्वाची भावना ही देखील यासाठी कारणीभूत ठरते. असे असले तरी यासंबंधी नागरिक हळूहळू कृतीशील

होताहेत, ही एक चांगली बाब म्हणता येईल. आता, नागरिक आपल्या मागण्या वा तक्रारी सरकारपर्यंत पोचवीत आहेत आणि आपल्या अधिकारांचा हिरिरीने पुरस्कारही करीत आहेत. आता, शांतता हा प्रश्न त्यांच्या कामांच्या यादीत जागा मिळवून आहे. अर्थात, हे प्रश्न त्वरित सुटणार नाहीत, याची कल्पना त्यांनाही आहे, पण त्यांचा आशावाद बळकट आहे.

"आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि पाकिस्तानातील मूलतत्त्ववाद यांच्या परस्परसंबंधांबाबत जगात काळजीचे वातावरण आहे, याची मला कल्पना आहे. हे खरे आहे की आमच्या देशात काही अतिरेकी गट आहेत, पण ते संपूर्ण समाजाचे किंवा समाजातील बहुसंख्यांचेही प्रतिनिधित्व करीत नाहीत. पाकिस्तानाबाहेरील देशांना व समाजांना त्यांचा धोका आहेच; पण त्यापेक्षाही त्यांचा अधिक धोका या देशांतर्गत समाजालाच आहे. या अतिरेक्यांविरूद्धच्या कारवाईला कर्करोगाप्रमाणे समजून नाहीसे करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना प्रसारमाध्यमांद्वारे भरपूर प्रसिद्धी दिली जाते. मात्र, त्याचवेळी लोकशाही व धर्मनिरपेक्षतेला पाठिंबा देणाऱ्या समाजातील घटकांच्या आवाजाकडे दुर्लक्ष होते. विविध स्त्री संघटना, वकिलांच्या संघटना, कामगार व शेतकरी संघटना या आपापल्या शक्तीप्रमाणे यासंबंधी कार्य करीत आहेत. अण्वस्त्रांना विरोध करणाऱ्या, बंदुकांना नाकारणाऱ्या आणि भारतीय समाजावरील हल्ल्यांचा निषेध करणाऱ्या या गटांची संख्या जास्त नसली तरी असे गट या समाजात आज आहेत, ही वस्तुस्थिती आहे. या गटांची क्षमता मोठी आहे, अतिरेकी गटांचा आवाज नमविण्याची त्यांची शक्ती आहे. पण, त्यांना जागतिक पातळीवर तसे सहकार्याचे वातावरण हवे आहे.

"आज, जागतिक घडामोडींपासून कोणताही समाज दूर राहू शकत नाही, त्याप्रमाणेच पाकिस्तानमधील समाजावरही अशा बदलांचे परिणाम होत आहेत. यावेळी हेही लक्षात घेतले पाहिजे, की विकसित देशांकडून पाकिस्तानला न्याय्यतेची वागणूक मिळाली पाहिजे. विविध समाजगटांमधील 'आहे रे' व 'नाही रे' यांच्यातील दरी वाढणे हे योग्य ठरत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला निभाव कसा लागेल अशी या वंचित गटातील नागरिकांची चिंता आहे. आज, शक्तिमान राष्ट्रेही संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संस्थांना बाजूला सारून आपलेच म्हणणे खरे करण्याचा प्रयत्न करीत असतील तर इतर देश यापासून कोणता बोध घेतील ? निरपराध नागरिकांच्या हत्येचे समर्थन केले जात असेल आणि युद्धकैद्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य करण्यात आलेले हक्क मिळत नसतील, किंवा अन्यायाविरूद्धचा लढा हा 'बंडखोरी' समजून चिरडून टाकण्यात

येत असेल, तर संपूर्ण जगच शांतता व मानवाधिकारांच्या आदर्शापासून दूर जाते आहे, असेच म्हणावे लागेल.

"आज मी हे बोलण्याची संधी घेतो आहे कारण, मानवाधिकारांपासून वंचित राहिलेले समाजगट जर्मनीसारख्या विकसित राष्ट्रांकडून मदत मिळेल अशी आशा उराशी धरून बसले आहेत. शांतता व मानवाधिकार हरवलेल्या या लोकांना जगण्याच्या आशा दिसायला हव्या आहेत. जगाच्या नवीन व्यवस्थेत आपल्याला सामावून घेतले जाईल, आपल्याला न्याय व समानता मिळू शकेल, अशी खात्री त्यांना मिळायला हवी आहे. जगात शांतता व मानवाधिकांचे राज्य असावे यासाठी हेच करणे गरजेचे ठरणार आहे.

"अर्थात, याचा अर्थ या वंचित समाजगटांची काहीच जबाबदारी नाही, असे मात्र माझ्या मनात नाही. उदाहरणार्थ, दक्षिण आशियातील पाकिस्तान व भारत यांच्यातील प्रश्न पाहा. दोन्ही देशांनी जर परस्परांकडे शत्रुत्वाच्या भावनेनेच पाहिले तर दोन्ही देशांचे नुकसानच जास्त होणार आहे. या दोन्ही देशांनी अणुबॉंबची निर्मिती केल्याने त्यांच्यातील प्रश्न आता आणखी गंभीरतेकडे जात आहे. समोरच्या देशाला शत्रू समजून त्याला संपविण्याची भाषा वा धोरणे यांतून फक्त घृणा व तिरस्कार या भावनांची निर्मिती होते आणि लोकशाही व मानवाधिकार यांपासून दोन्ही समाज दूर जाऊन धार्मिक व जातीय ताणतणाव वाढतात. याची किंमतही समाजातील वंचित गटच चुकवीत असतो. पण तरीही आशेचा किरण जागविणारी दोन्ही समाजातील काही सद्विचारी माणसे पुढे येऊन या मार्गापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा व्यक्तिंवरच आज आमची आशा टिकून आहे. या लोकांचे मी मनापासून आभार मानतो व त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करतो.

"म्हणूनच आज, न्युरेमबर्गचे मी आभार मानतो, त्यांना धन्यवाद देतो. मला आणि मानवाधिकारांचे कार्य निष्ठेने करणाऱ्या, माझ्याशी अतिशय मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या भारतातील नागरिक टीस्टा सेतलवाड यांना संयुक्तरीत्या हा पुरस्कार देऊन न्युरेमबर्गने आमचा आशावाद आणखी प्रज्वलित केला आहे. तसेच यामुळे, भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांमधील समाजाला मैत्रीपूर्ण मार्गावर नेण्याची आमची जबाबदारी अधिक वाढली आहे, याची आम्हा दोघांनाही जाणीव आहे, हेही नमूद करतो.

"न्युरेमबर्गच्या औदार्यासाठी मी ऋणी आहे."

*(संदर्भ - 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट,' नोव्हेंबर २००३)*

कृषी (जपान)

# मुक्त व्यापारात शेतीला उतरती कळा

जागतिकीकरण व खुल्या व्यापाराच्या योजना राबविताना प्रत्येक देशात कोणता ना कोणता गट दुखावला जाण्याची वा त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. याच प्रक्रियेत सध्या जपानमधील शेतकरीवर्ग अडकला असून शेतीव्यवसाय उताराकडे झुकतो आहे.

जपानने, अलीकडे, मुक्त व्यापाराकडे आपला कल दर्शविला असून आशियातील काही देशांबरोबर व मेक्सिकोबरोबर खुला व्यापार करण्यासंबंधी काही करारही केले आहेत. उदाहरणार्थ, जपानमधील शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या किंमतीपेक्षा कमी किंमतीत, मेक्सिकोकडून डुकरांचे मांस आयात करण्याचे धोरणकर्त्यांनी ठरविले आहे. यामुळे जपानमधील शेतकरी अडचणीत आला आहे. यासंबंधी तो आता सरकारदरबारी दादही मागू शकत नाही, अशी स्थिती आहे; कारण जपानचे सरकार आता शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकूनच घेत नाही. पूर्वी मात्र असे नव्हते. जपानच्या राजकारणात कायम दबावगटांना किंवा विशेष हित जपणाऱ्या गटाला महत्त्व देण्यात आले होते. गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांचा असा दबावगट राजकीय नेत्यांच्या धोरणांवर प्रभाव पाडीत होता. राजकीय नेत्यांनी शेतकऱ्यांना खूपच झुकते माप दिले होते. शहरांमध्ये कारखाने व उद्योगधंदे यांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला असला तरी जपानच्या ग्रामीण भागांत मात्र शेतकरी वर्गाचे प्राबल्य होते. ग्रामीण भागाकडे जपानचे संस्कृतीरक्षक व राष्ट्रीय मूल्यसंवर्धक म्हणून बघितले जात होते. शेतकऱ्यांना भरपूर अनुदान देऊन, शेतीमालाला योग्य भाव देण्याचे येथील सरकारचे धोरण होते. त्यामुळे अल्पशी जमीन असतानाही येथील शेतकरी सधन झाला होता. अमेरिकेतील शेतकऱ्यांच्या तुलनेतही येथील शेतकऱ्यांना चांगली मिळकत होत असे. तो गरीब गटात न मोडता मध्यमवर्गीय गटात जाऊन बसला होता. मुख्य म्हणजे जपानचे नेते हे देखील ग्रामीण भागांतून आलेले असत, त्यामुळे शेतकऱ्यांप्रती त्यांची भूमिका सौहार्द्राची होती आणि राजकारणासाठी त्यांना शेतकऱ्यांच्या मतांची देखील गरज होती. आता मात्र वातावरण बदलले आहे.

जपानमध्ये, लोकसंख्या वाढीचा अल्प दर ही काळजीची गोष्ट झाली आहे. त्यातही ग्रामीण भागाला याचा फटका जास्त जोराने बसला आहे. ग्रामीण भागातील

शेतकऱ्यांचे वय वाढते आहे आणि शेती करण्यासाठी त्यांच्या हाताशी तरुण पिढीच नाही, असे चित्र आहे. शिवाय ग्रामीण भागातील लोकसंख्या शहरांकडे वळू लागली आहे. गेल्या दशकात, शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या एक चतुर्थांशाने घटली आहे; पुढील काही वर्षांत ती निम्म्यावर येईल असा अंदाज आहे. जे शेतकरी ग्रामीण भागात टिकून आहेत, त्यांच्यापैकी निम्म्याहून अधिक शेतकऱ्यांनी 'साठी' पार केली आहे.

## राजकारणाचा परिणाम

ग्रामीण भागातील या चित्राचा राजकारणावर व राजकारणाचा ग्रामीण-भागावर असा दोन्ही बाजूंनी परिणाम झालेला आहे. जपानच्या राजकारणात 'लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी'चे वर्चस्व आहे. या पार्टीचे आधीचे अनेक नेते व पार्टीला पाठिंबा देणारे 'पडद्यामागील नेते' यांचे मूळ ग्रामीण भागात असल्याने त्यांना या भागाकडे लक्ष देणे भाग होते. जपानचे सध्याचे पंतप्रधान जुनिशिरो कोईझुमी आणि या लिबरल पक्षाचे सरचिटणीस शिंझो अॅबे हे शहरातील जनतेच्या पाठिंब्यावर निवडून आले आहेत. पूर्वीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना सवलती देऊन व शेतीउत्पादनाशी संबंधित परदेशी मालावर मोठे आयातशुल्क लादून, पाठीशी घातले व आंतरराष्ट्रीय स्पर्धेपासून त्यांना दूर ठेवले, तसे हे नेते आता करीत नाहीत. जपानमधील शेतीला प्रोत्साहन देणे हा त्यांचा प्राधान्याचा विषयच राहिलेला नाही. शेतीक्षेत्र खुले करण्याच्या बाजूने त्यांची धोरणे आहेत. 'जपानमधील शेतकरी जमात आता मरणासन्नतेच्या पंथाकडे जात आहे,' असे मत १९९०च्या दशकात जपानचे कृषिमंत्री असलेल्या नेत्याने व्यक्त केले आहे.

त्यामुळे अलीकडेच, पंतप्रधानांनी विविध देशांबरोबर खुल्या व्यापाराच्या चर्चा यशस्वी करून शहरांतील मतदारांना खूष करण्याचे प्रयत्न केले तेव्हा, शेतकऱ्यांच्या उरल्यासुरल्या आशाही नष्ट झाल्या. अर्थात, यावेळी शेतकरीवर्गाने निदर्शने केली व आपल्या मागण्या पुढे रेटल्या; त्यामुळे चर्चा शंभर टक्के यशस्वी झाल्या नसल्या तरी ते होणे अटळ आहे, असे मत सरकारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. जपानच्या शहरी भागांत खुल्या व्यापाराच्या बाजूने नागरिकांचे मत आहे. कारण, एकतर, त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांत निर्यातवाढीच्या संधी हव्या आहेत आणि दुसरे म्हणजे त्यांना विविध ग्राहकोपयोगी वस्तू स्वस्त दरांत मिळू शकतील, असा त्यांचा होरा आहे. राजकीय नेत्यांसाठी देखील आता शहरांतील मध्यमवर्ग महत्त्वाचा ठरतो आहे, पूर्वीच्या राजकारणातील 'शेतकरी लॉबी' आता दुय्यम ठरली आहे.

कारणे कोणतीही असली तरी जपानमधील शेतीला उतरती कळा लागली आहे हे मात्र दिसून येते. उदाहरणार्थ, कागोशिमा भागात क्यूशू नावाचे बेट आहे. येथील स्थानिक अर्थव्यवस्था ही डुकरांच्या मांसाचे उत्पादन करण्यावर उभी होती, ती आता कोलमडून पडण्याची शक्यताच जास्त आहे. या भागातील शेतकऱ्यांनी जपानमधील शेतीचे कसे नुकसान होत आहे हे सांगणारे वृत्तपटही टी.व्ही.वर दाखविले, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. जपानमध्ये तांदुळाचे पीकही मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. एकेकाळी भरघोस पीक घेणाऱ्या जमिनींमध्ये आता तणांचे साम्राज्य आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये शेतीमालाचे भाव सतत कोसळत असून शेतीक्षेत्रातून मिळणारे उत्पन्नही कमी झाले आहे. यामुळेच जपानमधील ग्रामीण भागातून शहरांकडे लोकांचे स्थलांतर होत असल्याचे मत आहे. पूर्वी शेतीव्यवसाय हा परंपरेने चालत येणारा एक चांगला व्यवसाय होता, तसे महत्त्व शेतीला होते. आता मात्र, जपानमधील शेतकरी आपल्या मुलांना व नातवंडांना शेती करण्याचा आग्रह करीत नाहीत, असे चित्र आढळते. एकेकाळी शेतीसंबंधी काही मोजकीच उत्पादने आयात करणाऱ्या जपानमध्ये आता गरजेच्या फक्त ४० टक्के उत्पादन हे देशात होते, (म्हणजे सुमारे ६० टक्के आयात केले जाते). शेतकऱ्यांच्या संघटना उभ्या करणे वा राजकीय दबावगट तयार करणे हे कामही आता पूर्वीसारखे सोपे राहिलेले नाही. शेती करणाऱ्या कुटुंबांची संख्याच कमी होत असताना दबावगट तरी कसे तयार करणार ? असा प्रश्न आहे.

कौटुंबिक शेतीचे प्रमाण कमी होत असले तरी जपानमध्ये सध्या मोठ्या कंपन्यांनी शेती करण्याचे प्रयत्न मात्र वाढताहेत. येथील सुपरमार्केटच्या क्षेत्रात असलेल्या मोठ्या कंपन्या आता डुकरांची पैदास करू पाहात आहेत. जपानने जागतिक बाजारपेठेत उतरावे यासाठी अशा मोठ्या कंपन्यांना शेतीसाठी प्रोत्साहन देण्याच्या योजना सरकार तर्फे राबविण्यात येण्याची शक्यता आहे. जपानमधील शेतीची रचना बदलून त्याचे व्यापारीकरण करणे फायद्याचे ठरेल, असे आता धोरणकर्त्यांचे म्हणणे आहे. सध्या तरी मोठ्या कंपन्यांनी शेतीक्षेत्रांत उतरण्याचे हे प्रमाण फक्त ०.३४ टक्के एवढेच आहे. हळूहळू ते वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असे दिसते. जपानच्या राजकारणात अग्रेसर असलेल्या शेतीसंबंधित दबावगटामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर, जपानच्या शेतीची वाढ रोखली गेली होती. आता तसे होणार नाही व जपानला आंतरराष्ट्रीय व्यापारात त्याचा फायदा होईल, असे म्हटले जाते. शेतकऱ्यांचे काय ? हा प्रश्न मात्र अनुत्तरित आहे. *(संदर्भ - एफ.ई.ई.आर., २६ फेब्रुवारी २००४)* ■■

विज्ञान-संशोधन

# भारतातील विज्ञान-संशोधन, उद्योग आणि संपत्तीची निर्मिती

भारतात, विज्ञान क्षेत्रात नवनवीन संशोधन होत असते. विज्ञानाशी संबंधित मोठ्या प्रकल्पांमध्ये अशा संशोधनांचा वापर केला जातो. मात्र ते संशोधन औद्योगिक समूहांपर्यंत पोचून, ग्राहकोपयोगी उत्पादनांमध्ये वापरून त्या संशोधनावर आधारित उत्पादन वाढवून संपत्ती मिळविणे हे घडतेच असे नाही. अलीकडे मात्र, यासंदर्भात काही प्रयत्न जरूर होताहेत.

'नॅशनल सिंपोझियम ऑन स्ट्रॅटेजिक मटेरियल्स अँड टेक्नॉलॉजीज फॉर कॉम्पोझिटस्' असा कार्यक्रम गेल्या वर्षी हैदराबाद येथे झाला. त्यावेळी 'कॉम्पोझिटस्'चे (Composites) संशोधन आणि त्यासंबंधीची बाजारपेठ यांवर विचार करण्यात आला. ग्राहकोपयोगी उत्पादनांचा विचार करताना, ही बाजारपेठ बरीच मोठी असल्याचे लक्षात आले. अमेरिकेची ही बाजारपेठ ५० बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी असून त्यापैकी १५ बिलियन अमेरिकन डॉलर्सची बाजारपेठ आशियातील देशांमधून अमेरिकेला मिळते. आशियात, ही बाजारपेठ प्रामुख्याने पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्याच्या क्षेत्रात आणि औद्योगिक व ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या क्षेत्रातून उपलब्ध होते. म्हणजे या बाजारपेठेत शिरकाव केल्यास, भारताला एकीकडे आपल्या उत्पादनांची निर्मिती करताना खर्च वाचविता येईल. कारण त्यांना परदेशातून अशी मिश्रणे विकत घ्यावी लागणार नाहीत आणि दुसरीकडे, ती इतर देशांनाही विकताही येतील. म्हणजे भारताला या व्यापारातून होणारा आर्थिक लाभही चांगला असू शकेल.

'कॉम्पोझिटस्' म्हणजे कोणत्यातरी दोन पदार्थांचे मिश्रण होय. एखादे मिश्रण हे कॉम्पोझिटस् प्रकारात मोडते किंवा नाही यासाठी तीन मुद्दे विचारात घेतले जातात. एक म्हणजे, त्या मिश्रणात दोन वेगवेगळे घटक पदार्थ बऱ्यापैकी प्रमाणात (अगदी सम प्रमाणात नसले तरी) आहेत किंवा नाहीत, दुसरे म्हणजे, नव्या मिश्रणाचे गुणधर्म वापरलेल्या त्या दोन घटकवस्तूंच्या गुणधर्मापेक्षा भिन्न असायला हवेत, आणि तिसरे म्हणजे, हे दोन घटक पदार्थ एकत्र करताना ते, मिश्रण तयार करण्याच्या विशिष्ट पद्धतींतूनच तयार करण्यात आले पाहिजे. मटेरियल किंवा घटकपदार्थांच्या क्षेत्रात,

'कॉम्पोझिटस्' हे एक अद्‌भूत मटेरियल मानले जाते. विमानापासून ते स्वयंपाकघरातील भांड्यांच्या मुठी तयार करण्यापर्यंत याचा वापर करण्यात येतो. कृत्रिम अवयव (उदाहरणार्थ, जयपूर फूट) तयार करतानाही ते उपयोगी ठरू शकतें. 'अग्नी' हे क्षेपणास्त्र तयार करतानाही भारताने स्वदेशात तयार केलेल्या 'कॉम्पझिटस्'चा वापर केला होता. पण यांचा, सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध उत्पादनांमध्ये कसा उपयोग होईल, यासंबंधी फारसा विचार झाला नाही. आणि भारतीय उद्योगक्षेत्रदेखील यापासून दूरच राहिले होते. कारण, विविध उत्पादनांमध्ये 'कॉम्पोझिटस्' वापरायची विशिष्ट तंत्रे एकतर उद्योगांजवळ नसावीत आणि दुसरे म्हणजे, अशी मिश्रणे वा मटेरियलस् वापरून, ग्राहकांचा फायदा व्हावा यासाठी उत्पादनांचा दर्जा वाढवूनही किंमत कमी कशी ठेवायची, असा पेच त्यांना पडला असावा.

यासंबंधी झालेल्या परिसंवादात, 'कॉम्पोझिटस्'ची सविस्तर माहिती औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोचून त्यांच्या विज्ञानासंबंधीच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी काही विचार झाला. केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या हैदराबाद येथील, 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन'च्या (डी.आर.डी.ओ.) मिसाईल विभागाशी संबंधित असलेल्या 'द ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स लेबॉरेटरी' (ए.एस.एल.) तर्फे या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यात भारतातील किमान बारा संशोधन संस्थांमधील अनेक शास्त्रज्ञ व तज्ज्ञ सहभागी झाले होते. भारताने संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या 'अग्नी' या क्षेपणास्त्राचे यशस्वी उड्डाण केले; तेव्हा त्यात कार्बन 'कॉम्पोझिटस्' वापरण्यात आले होते. यावेळी वापरण्यात आलेल्या मटेरियलपैकी ३५ टक्के मटेरियल हे 'कॉम्पोझिटस्' या प्रकारातील मटेरियल होते. येत्या तीन-चार वर्षांमध्ये हे प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न असेल, असे 'अग्नी' प्रकल्पाचे प्रोग्रॅम डायरेक्टर राम नारायण अग्रवाल यांनी सांगितले.

'कॉम्पोझिटस्'चे वेगवेगळे व अत्याधुनिक प्रकार तयार करताना 'मूल्य' ही फार महत्त्वाची बाब आहे. नवनवीन तंत्रज्ञान वापरून उत्पादनांचा दर्जा वाढविणे व मूल्य कमी ठेवणे हे यापुढील काळात गरजेचे ठरणार आहे. वेगवेगळ्या उत्पादनांमध्ये भारताची 'कॉम्पोझिटस्'ची, विशेषतः कार्बन 'कॉम्पोझिटस्'ची मागणी वाढणार आहे. त्यातच अशी मिश्रणे वा मटेरियलस् आयात करायची झाल्यास ती आयात करणे दरवेळी शक्य होईलच असे नाही, विविध कारणांमुळे या मटेरियलस्‌ची आयात करण्यासाठी नकारही मिळू शकतो. त्यामुळे भारताने या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याची गरज आहे, असे

मत यावेळी व्यक्त करण्यात आले. संरक्षण मंत्रालयाचे वैज्ञानिक सल्लागार व्ही. के. आत्रे यांनी म्हटले की, नवे तंत्रज्ञान व उत्पादने यांची सांगड असणे हे महत्त्वाचे आहे. नव्या संशोधनातून वा तंत्रज्ञानातून संपत्ती निर्माण होणे गरजेचे असते. जे तंत्रज्ञान वा संशोधन संपत्ती निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरत नाही ते उपयोगी आहे, असे कसे म्हणता येईल ? भारतातील विविध संस्थांमधून संशोधन विकास केंद्रे स्थापन होणे जरूरीचे आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भारतातील औद्योगिक संस्थांकडे संशोधन विकास केंद्रांची सोय नसल्यास त्यांना सरकारच्या संशोधन केंद्रांची मदत घेता येईल. त्याचा त्यांनी उपयोग करून घेतला पाहिजे, असेही आत्रे यांनी म्हटले.

संशोधन व नवतंत्रज्ञानाचा व्यापारी उपयोग करण्यात भारत मागे पडतो. ही बाब लक्षात घेऊन ती उणीव दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. केंद्र सरकारच्या संशोधन विभागांनी केलेल्या प्रयोगांचा, संशोधनांचा उपयोग उद्योजकांनी करावा, यासाठी त्यांना मदत करण्याचा दृष्टिकोण या परिसंवादातून पुढे मांडण्यात आला. 'कॉम्पोझिटस्'चे तंत्रज्ञान फक्त 'जयपूर फूट' किंवा 'अग्नी' यापुरतेच मर्यादित राहायला नको तर इतरही क्षेत्रांतील उत्पादनांमध्ये त्याचा वापर करण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे. या दृष्टीने 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन'ने (डी.आर.डी.ओ.) यासंबंधीचे तंत्रज्ञान 'कॉम्पोझिटस्'च्या उत्पादकांना सुरूवातीस विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे. उत्पादकांना या क्षेत्रात जसजसा नफा होईल तसेतसे त्यांनी डी.आर.डी.ओ.ला या तंत्रज्ञानाची रक्कम द्यावी, असे सुचविण्यात आले आहे.

भारताने काही धाडसी पावले उचलून आणि खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकांनी एकत्र येऊन काही योजना आखल्या; तर अशा संशोधनांचा उपयोग संपत्ती निर्माण करण्यासाठी होईल.

*(संदर्भ - करंट सायन्स, १० फेब्रुवारी २००४मधील निरूपा सेन यांचा लेख)*

■■

*चीनचे व्यापारी केंद्र असलेले शांघाय हे शहर भविष्यात समुद्रात गडप होऊ शकते, असे इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. पृथ्वीचे वाढते तपमान व शांघाय शहरात, बांधकाम क्षेत्राची वेगाने होणारी वाढ ही कारणे यामागे आहेत. १९२१ ते १९६५ या काळात शांघाय शहर २.६३ मीटर्स एवढे पाण्याखाली आले आहे.*

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, १५ मार्च २००४)*

विज्ञान-संशोधन

# आयुर्वेदः वनौषधींचा शोध, दर्जा व बाजारपेठ

औषधीशास्त्रात सध्या विविध प्रकारची नवनवीन औषधे व त्यासंबंधीचे संशोधन याला फार महत्त्व आले आहे. या नवीन औषधांमधील अनेक (सुमारे ८० टक्के) औषधे ही वनौषधी या गटात मोडणारी आहेत. त्यातही नैसर्गिक वनौषधी (नॅचरल फार्मास्युटिकल्स म्हणजे नॅचरास्युटिकल्स), पोषणदायी औषधे (न्युट्रास्युटिकल्स), आणि सौंदर्यवर्धक (कॉस्मेस्युटिकल्स) या तीन प्रकारांना जास्त महत्त्व आले आहे. या औषधांची बाजारपेठही प्रचंड मोठी आहे. २००३ या वर्षात अमेरिकेत अशा औषधांची विक्री ६५ बिलियन अमेरिकन डॉलर्सपेक्षाही जास्त झाली. याच वर्षातील, अमेरिकेची, पोषणदायी औषधांच्या क्षेत्रातील बाजारपेठ ही १० ते १२ बिलियन अमेरिकन डॉलर्स आणि युरोपमधे ९ बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी होती. ही बाजारपेठ दरवर्षी वाढतच जाणार आहे, असा अंदाज आहे. ही बाजारपेठ वाढण्यासाठी अमेरिकेत, 'डाएटरी सप्लीमेंट हेल्थ अँड एज्युकेशन अॅक्ट' असे काही कायदेही सहाय्यभूत ठरीत आहेत.

आयुर्वेद हे प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र असून या शास्त्राने हजारो वर्षांपूर्वीपासूनच वनौषधींचा विचार विकसीत केला आहे. आता वरील पार्श्वभूमीवर आयुर्वेदिक औषधांचा सर्वंकष व सखोल विचार, संशोधक दृष्टिकोणातून होण्याची गरज आहे. भारतातील तसेच परदेशांतील अनेक कंपन्या असे संशोधन करण्यात रस घेत आहेत. वनौषधींचे संशोधन हे आता रसायनशास्त्र, जीवशास्त्र, जीव-रसायनशास्त्र, जनुकशास्त्र (जिनोम) अशा विविध शास्त्रांच्या मदतीने होणे व मग ते सर्वसामान्य नागरिकांसाठी व विविध रोगांवर परिणामकारक कसे ठरू शकेल, याचा विचार होणे हे आवश्यक आहे. थोडक्यात, आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान व परंपरागत ज्ञान याची सांगड घालणे हे आता गरजेचे ठरते आहे. संशोधनाच्या या टप्प्यावर, संबंधित सर्व विषयांच्या तज्ज्ञांनी येथे विचार करण्याची गरज भासते आहे. आयुर्वेदिक औषधे ही सामान्यतः प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतीचा सारासार विचार करून वैयक्तिक गरजेप्रमाणे दिली जातात. आयुर्वेदाने प्रकृती, रस आणि गुण या संकल्पना मध्यवर्ती मानल्या आहेत; यांचे प्रमाण शोधण्यासाठी

हैदराबाद येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी'ने 'हर्बोप्रिंट' या नावाचे तंत्रज्ञान विकसित करून त्याचे पेटंटही मिळविले आहे.

### वनौषधींचे संशोधन

आधुनिक पद्धतीप्रमाणे कोणत्याही औषधाचे संशोधन करताना काही विशिष्ट टप्प्यांमधून जावे लागते. वनौषधी तयार करताना देखील त्यातील मूळ घटक पदार्थ, त्यांचे प्रमाण व दर्जा, त्यांचे औषधी व रासायनिक गुणधर्म, त्यांच्या वापरासंबंधीची सुरक्षा, प्रयोगशाळेतील व विविध स्तरांवरील त्यांच्या चाचण्या इत्यादी प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. आधुनिक तंत्रज्ञान वापरात नसताना व घटक पदार्थांचा दर्जा तपासण्याच्या पद्धती माहिती नसताना आयुर्वेदिक औषधांचा विकास झाला. हजारो वर्षांपासून ही परंपरागत औषधे माहीत आहेत व त्यांचा वापरही होतो आहे. हजारो वर्षांच्या या काळात निसर्गातील अनेक गोष्टी बदलल्या, तसाच काही परिणाम नैसर्गिक असलेल्या या औषधी वनस्पतींवरही झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता, जर या औषधांचा जागतिक पातळीवर उपयोग करायचा प्रयत्न होत असेल, तर त्याच्या दर्जाविषयी संशोधकांनी वा उत्पादकांनी (चौकट पाहावी) काटेकोर

### मोठ्या कंपन्यांचा औषधाचा दर्जा शंकास्पद

आयुर्वेदिक औषधांमध्ये अश्वगंधा ही वनौषधी इतर काही औषधांबरोबर, अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरली जाते. ही वनौषधी शक्तीवर्धक, उत्साहवर्धक, बुद्धिवर्धक आहे. तसेच रोगप्रतिबंधक शक्ती वाढविण्यासाठीही याचा वापर अनेक औषधांमध्ये होतो. या वनौषधीपासून इतरही काही रसायने तयार होतात. त्याला 'विदेनॉलिड्स्' म्हणतात. यातील 'विदेफेरिन-ए' हे रसायन अश्वगंधा या वनौषधींचे प्रमाण निश्चित करते. भारतातील काही प्रसिद्ध कंपन्यांची ही वनौषधी हा मुख्य घटक असलेली दहा विविध औषधे तपासण्यात आली तेव्हा त्यात या 'विदेफेरिन-ए' चे प्रमाण अगदी उत्तम म्हणजे १०० टक्क्यांपासून ०.९ टक्के एवढे कमी असे आढळले. नऊ औषधांमध्ये तर हे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी असल्याचे आढळले. वनौषधींचा दर्जा हा महत्त्वाचा असून त्यात सातत्यही असायला हवे, हे या तपासणीतून स्पष्ट झाले. यासंबंधी भारतात काही नियमावली वा कायदे नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे.

*(संदर्भ - करंट सायन्स -१० फेब्रुवारी २००४, डाऊन टू अर्थ -३१ मार्च २००४)*

होण्याची गरज आहे. वनौषधींचा दर्जा कायम राखणे हे एक आव्हान आहे, कारण पर्यावरणातील बदलांमुळे काही वनौषधींमध्ये बदल होत गेले असण्याची शक्यता आहे. आणि आधुनिक औषधनिर्माणशास्त्राचे सगळेच नियम वनौषधींना लगेचच लागू करणेही शक्य नाही. वनौषधींचे निसर्गातील स्थान व आत्तापर्यंतचा त्यांचा झालेला उपयोग हे लक्षात घेऊन त्यांच्यासंबंधीचे धोरण लवचिक ठेवावे लागेल; तरच दर्जाचा प्रश्न काही प्रमाणात तरी सोडविता येणे शक्य आहे.

वनौषधींच्या संशोधनाबाबत एक वेगळा मार्ग अवलंबिता येणे शक्य आहे का, याचा विचार व्हायला हवा. म्हणजे सध्याची औषध निर्मितीची जी प्रक्रिया वा टप्पे आहेत, त्याच्या एकदम उलट टप्पे वनौषधींच्या संशोधनात घेता येतील. त्याला 'रिव्हर्स फार्माकॉलॉजी' असे म्हणता येईल. आधुनिक औषधे ही विविध चाचण्यांमधून उत्तीर्ण झाल्याखेरीज बाजारात विक्रीसाठी येऊ शकत नाहीत (यासंबंधीचा लेख अर्थबोधपत्रिकेच्या एप्रिल २००४ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे). त्याउलट, परंपरागत औषधांचा पाया हा, 'त्यांचा हजारो वर्षांपासूनचा वापर' हा असतो. म्हणजे त्यांचे बाजारपेठेतील अस्तित्व हे गृहीत असते. तरीदेखील परंपरागत औषधांचा, त्यांच्या वापराबद्दलचा दावा, हा शास्त्रशुद्ध मार्गाने तपासला जायला हवा. वनौषधींच्या चाचण्यांची सुरूवात ही त्याचा वापर, त्यासंबंधी उपलब्ध असलेली माहिती, या आधारे होऊ शकते. सध्याच्या चाचण्यांमध्ये हा शेवटचा टप्पा असतो. या मार्गाने गेल्यास औषधांच्या चाचण्यांचा खर्च व वेळ निश्चितपणे वाचेल.

'आयुजिनॉमिक्स' या संकल्पनेचाही विचार या टप्प्यावर व्हायला हवा. वांशिक भेदानुसार काही रोगांचे प्रकार कमी-जास्त आढळू शकतात का ? हा अभ्यास करणे आता गरजेचे ठरावे. मानवजात ही निग्रॉइड, मंगोलॉईड आणि कॉकेसॉईड या तीन वांशिक गटात प्रामुख्याने विभागली गेली आहे. जीन्सचा विचार करता मात्र त्यात ९९.९ टक्के साम्य आढळते. तरीदेखील प्रत्येक माणसाची शरीररचना, आवडी-निवडी, आचार-विचारपद्धती यांमुळे प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्यापासून भिन्न असते आणि औषधोपचार करताना या सर्वांचा एकत्रित विचार होणे, हेही गरजेचे असते. आयुर्वेदाने हा विचार सुमारे साडेचार हजार वर्षांपूर्वीच केलेला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

*(संदर्भ - करंट सायन्स - २५ मार्च २००४मधील भूषण पटवर्धन, अशोक डी.बी. वैद्य आणि मुकुंद चोरघडे यांचा लेख आणि डाऊन टू अर्थ - ३१ मार्च २००४ मधील विभा वर्ष्णे यांचा लेख)*

सामाजिक

# सामान्यांची राणी

निदरलँडस्ची 'सामान्यांची राणी', प्रिन्सेस ज्युलियाना हिचे दिनांक २० मार्च २००४ रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले.

वास्तविक राजे किंवा राण्या ही सामान्य माणसे नव्हेतच. खरं तर इतरांसारखीच ती श्वासोच्छ्वास करतात, खातात-पितात. दैनंदिन जीवनव्यवहार करतात, अगदी प्रेम आणि राग-लोभही असतात त्यांच्या जीवनात. तरीही ती सामान्य माणसे नसतातच. एक तेजोवलय असते त्यांच्याभोवती.

प्रिन्सेस ज्युलियानाने आपल्या वयाच्या १८ व्या वर्षी एक सदस्य म्हणून संसदेत प्रवेश केला, आणि राणी म्हणून सत्ताग्रहण केले. एक 'राणी' म्हणून तिने आपले सर्व आयुष्य राजवाड्यांतच अनेक नोकरांसमवेत व्यतित केले. अगदी अकराव्या वर्षांपासून तिला खाजगी शिकवणीद्वारे शिक्षण घ्यावे लागले. जेव्हा विवाहाचे वय झाले, तेव्हा तिच्या आईने तिच्यासाठी उपवर शोधून काढला. त्याला, ज्युलियानाचा पती म्हणून कसे वागायला हवे, आणि किती पैसे त्याला मिळतील वगैरे काटेकोर सूचना देऊन करारबद्ध केले.

ही निदरलँडस्ची राणी मात्र 'सामान्यांची' राणी होऊ पाहत होती; सामान्यांचे जीवन जगू पाहत होती. तिने आपले 'राणीपण' जणू दूरच सारले होते. तिने आपल्या मुलांना सरकारी शाळांतून घातले; आणि आपला किराणा ती स्थानिक बाजारातून आणत असे. गुडघ्यापर्यंतचे फ्रॉक्स घालून सायकलवरून जातानाचे तिचे फोटोही काढले जात असत.एवढेच नाही तर, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तिला जेव्हा परागंदा होऊन ओटावासारख्या छोट्या गावात राहावे लागले होते, तेव्हा तर (ही 'राणी' होण्यापूर्वीची ज्युलियाना) ती सिनेमाच्या रांगेत तिकिटासाठी उभी असलेली दिसत असे; किंवा शेजाऱ्यांची मुलेही सांभाळत असे. पुढे 'राणी'चे पदग्रहण केल्यानंतरही ती केव्हाही, कोणताही जामानिमा बरोबर न घेता, शाळांमधून किंवा इस्पितळांमधून सहजपणे फेरफटका मारत असे आणि एखाद्या प्रेमळ आईसारखी आस्थेने सर्वांची विचारपूस करीत असे. राजवाड्यात येणाऱ्या पाहुण्यांना स्वतः चहा करून देणारी आणि या पाहुण्यांनी मदतीसाठी केलेला हात थांबविणारी ही राणी, 'सामान्यांची राणी' झाली

होती. परंतु डच लोकांना, ही आपली, सायकलवरून कुणाच्याही संरक्षणाविना फेरफटका मारणारी राणी, सर्वसत्ताधारी म्हणून कशी स्वीकारावी असा प्रश्न पडत असे. काहींना तर तिने अचंबित केले होते ते निदरलँडस्च्या मोठ्या हिंमतीने प्राप्त केलेल्या साम्राज्यातून इंडोनेशिया व सुरिनाम या देशांना सरळपणे स्वातंत्र्य बहाल केले तेव्हा. याऊलट जेव्हा ऐन शीतयुद्धाचा पेटता काळ होता, तेव्हा तिने थेट अमेरिकन काँग्रेसपुढे भाषण करताना, 'राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्परांत अधिक सामंजस्य असायला हवे,' असा स्पष्ट उपदेश केला तेव्हा तर राजकीय वर्तुळ हादरलेच होते.

१९८० साली ज्युलियानाने अगदी सहजपणे, आपले राणीपदाचे वस्त्र उतरवून ते आपल्या लेकीकडे, ब्रियाट्रिसकडे सुपूर्त केले, तेव्हा तर लोकांची खात्रीच पटली की या आपल्या राणीला राणीपदाचे फारसे कौतुक नव्हतेच; तिला ते हवेसे कधी वाटतच नव्हते की काय !

राणी ज्युलियानाचा हा साधेपणा आणि सत्तापाशात न अडकण्याचा स्वभाव मात्र डच परंपरेशी इमान राखणाराच आहे. तसे तर इतिहासात, डच लोकांची 'राजेशाही' उशीराच जन्माला आलेली आहे. ज्या काळात, युरोपमधील 'राजे' परागंदा तरी होत किंवा गिलोटिनखाली मारले तरी जात, त्या काळात ही राजसत्ता उदयास आली ती १८१५ साली. त्यापूर्वीची निदान दोन शतके तरी तिथे मध्यमवर्गीय लोकांचीच सत्ता होती. तेथील व्यापारी, आपल्या उंच काळ्या हॅटस् घालून आशियातील कानाकोपऱ्यातील देशांमध्ये आपली जहाजे पाठवीत असत आणि नफा कमवून आणत असत. सतराव्या शतकात हॉलंडमध्ये, असे 'व्यापारीपण' अंगी असणे पुरेसे होते. हे उद्योजक व्यापारी, जमिनी वगैरेंच्या फंदात न पडता आणि बादशाह-दरबार अशांच्या नादी न लागता, सुखनैव देश 'हाकत' होते, आणि जगभर 'मुशाहिरी' करीत होते.

अशा प्रवृत्तीच्या देशाने, राजसत्ता जन्माला घालणे तसे विचित्रच होते. त्याहूनही विचित्र गोष्ट अशी की, स्पेनच्या राजाशी दोन हात करणाऱ्या स्वातंत्र्य-सैनिकांच्या वारसांपासून ही नवी 'राजसत्ता' निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे निदरलँडस्च्या संसदेला तसा सामान्यत्वाचा वसा मिळालेला होताच; आणि म्हणूनच निदरलँडस्ची राजसत्ता ही तिच्या आत्म्यात 'लोकसत्ता'च होती. कुणीही कुणापेक्षाही मोठा नाही, ही डचांची भावनाच होती. त्यामुळे खरं तर, अशा ठिकाणी राजसत्ता अस्तित्वात येणे ही विसंगती होती. आणि म्हणूनच असेल कदाचित, पण ज्युलियानाने स्वतःचे राणीपद हे 'प्रमुख सामाजिक कार्यकर्ती' म्हणूनच भूषविले होते.

गोष्ट १९५३ सालची आहे. झीलंडमध्ये, पाचशे वर्षांत झाले नव्हते असे भयानक वादळ उद्‌भवले; आणि सुमारे दोन हजार बळी घेऊन शमले. या वादळात या देशाची राणी मात्र भर पुराच्या पाण्यात, आपल्या जुनेऱ्या कपड्यांत, घरेदारे वाहून गेलेल्यांना अन्न नि वस्त्रांचे वाटप करीत हिंडत होती. देशाची राणी अशी सामान्यातील सामान्य होऊन, एक व्यक्ती म्हणून, या राष्ट्रसंकटात समाजकार्य करीत फिरत होती. रेडक्रॉसची अध्यक्ष म्हणून, या राष्ट्रसंकटात समाजकार्य करीत फिरत होती. यापूर्वीही तिने १९४५ सालच्या दुष्काळात, नव्यानेच स्वतंत्र झालेल्या तिच्या देशात, हे काम केले होते. कोणीही शेतकऱ्याची किंवा व्यापाऱ्याची बायको करील तसेच काम ती करीत होती.

१९४८ साली, ज्युलियानाने जेव्हा देशाच्या सम्राज्ञीपदाचे पदग्रहण केले तेव्हा तिने म्हटले होते, "मी अशी कोण आहे की मी हे पद स्वीकारावे ?" तिने स्वतःच्या आयुष्यावर केलेले हे भाष्यच मुळी तिच्या दीर्घ अशा आयुष्यभरच्या कार्याचे वर्णन नव्हे काय ? *(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, १० एप्रिल २००४)* ■■

## अखेरीस मोर्देचाई वॅनूनूची सुटका

इस्रायलमधील तंत्रज्ञ मोर्देचाई वॅनूनूची (पाहा, 'अण्वस्त्रांच्या विरोधात, सतरा वर्षे तुरूंगात !', अर्थबोधपत्रिका, मार्च २००४, ) २२ एप्रिल २००४ रोजी इस्रायलच्या अॅशकेलोन तुरूंगातून सुटका करण्यात आली. त्याच्या सुटकेनंतर त्याचे स्वागत करण्यासाठी तुरूंगाबाहेर त्याच्या चाहत्यांनी गर्दी केली होती. इस्रायलच्या अण्वस्त्रांबाबतची माहिती (१८ वर्षांपूर्वी) उघडकीस आणल्याबद्दल वॅनूनूला १८ वर्षांचा तुरूंगवास भोगावा लागला. पण, 'तेव्हा आपण बरोबर तेच केले,' असा त्याचा आजही दावा आहे व सुटकेनंतर त्याने आपल्या भूमिकेवर आपण ठाम असल्याचे सांगितले. सुटकेनंतरही वॅनूनूवर बरेच निर्बंध आहेत. त्याला इस्रायल सोडून परदेशी जाता येणार नाही व इस्रायलमधील परकीय दूतावासांशी संपर्क साधता येणार नाही. अण्वस्त्रांच्या विरोधातील लढ्यामुळे, वॅनूनूचे नाव शांततेसाठी देण्यात येणाऱ्या नोबेल पुरस्काराच्या यादीतही गेले आहे. वॅनूनूचे स्वागत करण्यासाठी 'वॅनूनू फेस्टिव्हल'ची तयारी त्याचे चाहते करीत आहेत. शांततेचे नोबेल मिळालेले मान्यवर, अण्वस्त्रविरोधी अणुशास्त्रज्ञ व इतर अनेक शांतताप्रेमी नागरिक या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होत आहेत. *(संदर्भ - इंटरनेट)* ■■

सामाजिक

# अफगाणिस्तान: बामिया, तालिबान आणि आता...

अफगाणिस्तानमध्ये सध्या एक नवीनच प्रश्न उद्‌भवला आहे. येथील इतिहासकालीन वस्तूंची लुटालूट मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि सरकार त्याला प्रतिबंध करण्यात अयशस्वी ठरते आहे. अफगाणिस्तानमध्ये १९९९ मध्ये खारवार नावाचे प्राचीन शहर सापडले. तीन हजार वर्षांपूर्वीचे हे शहर म्हणजे इतिहास संशोधकांसाठी एक सुवर्णसंधीच होती. पण इतिहास संशोधकांना तेथे जाणे,आता धोक्याचे ठरते आहे आणि सरकार या संशोधकांना संरक्षण देण्यात असमर्थ ठरते आहे. हे शहर जेथे सापडले तेथे, संरक्षणार्थ सरकारने नऊ पोलिसांची नियुक्ती केली होती. गेल्या वर्षी यापैकी चार जणांची हत्या करण्यात आली आणि इतरांना तेथून पळून जाण्यास भाग पाडण्यात आले. लूटारूंची टोळी अफगाणिस्तानमधील इतिहासकालीन अनेक जागांची व वस्तूंची नासधूस करीत आहे. मंगोलियन, मॅसेडोनियन, पर्शियन आणि बौद्धवंशीयांच्या इतिहासकालीन अमूल्य वस्तू चोरून त्याची बेकायदा विक्री करण्याचा व्यापार येथे वाढीस लागला आहे.

अफगाणिस्तानमधील माहिती व सांस्कृतिक खात्याचे मंत्री सईद रहीन यांनी यासंदर्भात म्हटले आहे की, अशा जागांच्या संरक्षणार्थ त्यांनी काही महिन्यांपूर्वी पाचशे प्रशिक्षित पोलिसांची मागणी केली होती, पण अर्थखात्याकडून मंजूरी मिळाली नाही. असेही समजते की, अनेक लूटारू हे तालिबान गटाशी किंवा पाकिस्तानमधील काही गटांशी संबंधित आहेत. यापूर्वी बामिया येथील, पुरातन काळाचे वैभव असलेल्या मोठ्या बुद्धमूर्तींची मोडतोड करण्याच्या घटनेवरून हा देश व त्या देशातील तत्कालीन तालिबान सरकार हे कुप्रसिद्ध झाले होते. गंमत म्हणजे, खारवार शहर सापडले; त्यावेळी तेथे तालिबानची राजवट होती आणि या राजवटीने त्याचे लूटारूपासून संरक्षणही केले होते. अशा पुरातन वस्तूंची विक्री लिलावात करण्यात येऊन सामान्यत: ती तेलाच्या व्यापारातील श्रीमंत शेख किंवा लिलावाच्या बाजारातील मोठे व्यापारी यांच्या मालकीची होते. राष्ट्रसंघाच्या सांस्कृतिक संघटनेमार्फत बेकायदा व्यापारावर बंदी घालण्याचे प्रयत्न होत आहेत. पण सध्या तरी अफगाणिस्तानमधील पुरातनकालीन जागा ओस पडण्याचीच चिन्हे आहेत. *(संदर्भ-द इकॉनॉमिस्ट, १० एप्रिल२००४)*

(पान क्रमांक २ वरून)
वाटते की या ज्ञानापासून आपले राष्ट्र वंचित राहू नये. राज्यकर्ते जनतेच्याच कलाने चालणार. 'पगवॉश' ही संस्था फक्त शास्त्रज्ञांचेच मत परिवर्तन करू पाहत असेल, सामान्य लोकांपर्यंत ती चळवळ पोचवणार नसेल तर त्यांचे कार्य arm chair politics च्याच स्वरूपाचे राहील. अण्वस्त्रविरोधी चळवळ राज्यकर्त्यांवर वजन पाडू इच्छित असेल तर तिला जनतेचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे. पण अशी कोणतीही चळवळ अणुविज्ञानाचा प्रसार थांबवू शकणार नाही, अण्वस्त्रांचे उत्पादनही रोखू शकणार नाही. हे तंत्रज्ञान आणि निर्मित अस्त्रे जबाबदार व्यक्तींच्या नियंत्रणाखाली राहतील, त्या अस्त्रांचा उपयोग टाळण्यासाठी सतत प्रयत्न होत राहतील अशी काहीतरी सत्ताव्यवस्था निर्माण व्हायला पाहिजे. या मर्यादित उद्दिष्टाकरता आंतरराष्ट्रीय प्रयत्न सुरूही आहेत. या प्रयत्नांना बळकटी आणण्याचे प्रयत्न 'पगवॉश' करेल तर त्यापासून जास्त लाभ होईल, असे मला वाटते.

अण्वस्त्रे फार विनाशकारक आहेत, यामुळेच ती राजकीय ध्येये साधण्यासाठी उपयुक्त आहेत. केवळ शत्रूचा विनाश हे कोणत्याही युद्धाचे उद्दिष्ट नसावे, युद्धातून काहीतरी कमवायचे असते. पण अणुयुद्ध सुरू झाल्यास काही तासातच शत्रूबरोबर आपलाही विनाश होणे अटळ आहे, या जाणीवेनेच आत्तापर्यंत अणुयुद्ध होण्याचे टळले आहे. एकट्या अमेरिकेजवळ जेव्हा अणुबाँब होता तेव्हा त्यांनी तो बिनदिक्कतपणे जपानवर टाकला. सोव्हिएट संघानेही जेव्हा अणुबाँब तयार केला तेव्हा दोन्ही राष्ट्रांना व त्यांच्या अनुयायांना जास्त समजूतदारपणे वागावे लागले व अणुयुद्ध टळले. अण्वस्त्रज्ञानाचा प्रसार त्यादृष्टीने शांततेला पोषकच ठरला. आता छोटी अण्वस्त्रे तयार होत आहेत. खरे तर, तशी छोटी अस्त्रे तयार करण्यात असल्याचे वृत्त टाईम या नियतकालिकाने बऱ्याच वर्षांपूर्वी दिले होते. ती प्रत्यक्षात वापरली जातील की नाही ते आज सांगणे कठीण आहे. खरे तर, अण्वस्त्रांनी आतापर्यंत जितका विनाश झाला आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त विनाश पारंपरिक शस्त्रांनी झालेला आहे. वर्षानुवर्षे चाललेल्या व्हिएटनाम युद्धात, अरब-इस्रायली संघर्षात, अफगाणिस्तानमधील युद्धात, काश्मीरमधील दहशतवादात, आफ्रिकेच्या टोळीयुद्धातून, किती माणसे मारली गेली याची काही गणती आहे का ? आणि कुठेही युद्ध नसताना, शांततेच्या काळात, केवळ दुर्लक्ष आणि हेळसांड यांनी किती लोकांचे जीव जात असतील म्हणता ? अमर्त्य सेन यांनी हिशोब काढला आहे की मुलगे आणि मुली समप्रमाणात जन्मायला हवीत असे मानले तर भारतात स्त्रियांची

संख्या जितकी असायला पाहिजे त्यापेक्षा साडेतीन कोटीने ती कमी आहे. कुठे नाहीशा झाल्या या साडेतीन कोटी स्त्रिया ? असा पोलिसी प्रश्न ते विचारतात (case of the missing women). युद्धाबाहेरील या अन्यायाविरूद्ध चळवळ करणे, प्रत्यक्ष युद्धविरोध किंवा अण्वस्त्रविरोध करण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. अन्यायातून युद्धे निर्माण होतात. अन्यायावर उपाय शोधता आला तर हिंसा आपोआपच मंदावेल. अन्यायरहित समाज निर्माण करणे हाच अणुयुद्ध टाळण्याचा एकमेव उपाय आहे. तसा समाज निर्माण करणे हे आजतरी फक्त स्वप्नातच शक्य आहे. पण कमीतकमी ते एक प्रेरणादायक स्वप्न आहे.

*भ.पां. पाटणकर, हैदराबाद*

अर्थबोधपत्रिकेचे अंक आवडतात. अंकातील मजकूर दर्जेदार व विश्वासार्ह असतो. पुण्यातील स्थानिक वाचक वर्ग आपण नियोजित केलेल्या उपक्रमास हजर राहून त्याचा लाभ घेऊ शकतात. पण आमच्यासारख्या परगावच्या लोकांना हा लाभ घेता येत नाही. यासंदर्भात आपण काही योजना आखू शकाल काय ? विशेषतः तालुका पातळीवरील महाविद्यालयीन युवक -युवतींना त्याचा लाभ घेता येईल. यामुळे कदाचित, शहरे व खेडी यांतील वैचारिक अंतर कमी होईल.

*विजय कराडे, तासगांव*

आपल्या अंकात भारतीय अर्थशास्त्रीय आकडेवारी अद्ययावत मिळावी ही अपेक्षा आहे. एक विशिष्ट 'ॲनेक्शर' करून माहिती द्यावी. आपल्याकडील माहिती महाविद्यालयांप्रमाणे अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरेल व आपल्याकडून आल्याने अत्यंत खात्रीशीर व भरवशाची ठरेल. उदाहरणार्थ शेती, उत्पन्न, उद्योगांशी संबंधित, लोकसंख्या वगैरे विषयांवरील ही माहिती उपयोगी ठरेल.

*प्राचार्या, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.*

## WWW चे संशोधक टीम बर्नर्स ली यांना पुरस्कार

'वर्ल्ड वाइड वेब' म्हणजे WWW चा शोध (१९९१) लावणारे शास्त्रज्ञ टीम बर्नर्स ली यांना अलीकडेच (एप्रिल २००४) १२ लाख अमेरिकन डॉलर्सचा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत, जागतिक पातळीवर, एवढा मोठा पुरस्कार मिळविणारे ते पहिलेच मानकरी आहेत. त्यांच्या अलीकडच्या नवीन संशोधनाबद्दलचा एक लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या मे-जून २००२ च्या अंकात 'भाषाप्रभू संगणकीय महाजाल' या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

सामाजिक

# सहकारी चळवळीचे बदलते संदर्भ

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने 'सहकारी चळवळीचे बदलते संदर्भ' या विषयावर चर्चागटाची एक सभा रविवार, दिनांक ४एप्रिल २००४ रोजी संस्थेत आयोजित केली होती. त्यावेळी सहकार क्षेत्रात ४५वर्षे कार्य केलेले व विविध सहकारी संस्थांच्या दैनंदिन कामकाजात सहभागी असलेले मा. अ. देशमुख यांचे बीजभाषण झाले. त्यांच्या भाषणाचा व यावेळी झालेल्या चर्चेचा हा गोषवारा.)*

## बीजभाषण

### (१) सहकाराची संकल्पना, वैचारिक बैठक तत्त्वे, बदल

**(१.१)** समान गरज /गरजा असणारांनी एकत्र येऊन आपली/आपल्या गरज/गरजा भागविण्यासाठी उभी केलेली संस्था म्हणजे सहकारी सोसायटी. समान गरज, स्वेच्छेने एकत्र येणे, गरज भागविणे ही संकल्पना आजही कायम आहे, फक्त गरज याची व्याप्ती/स्वरूप कालानुरूप बदलत गेले आहे.

**(१.२)** सामाजिक आशय असलेली आर्थिक चळवळ अशीही सहकाराची व्याख्या केली जाते. सहकारात एकत्र येणाऱ्यांनी केवळ स्वत:पुरता विचार न करता समाजाचा विचार करावा, सामाजिक जाणीवा सजग ठेवाव्यात अशी अपेक्षा आहे.

**(१.३)** जगातली सहकारी चळवळ सुमारे दीडशे वर्षांची झाली आहे. भारतही सहकारी चळवळीची शताब्दी साजरी करीत आहे. रॉजडेल (१८४४) इक्विटेबल पायोनिअर्सनी स्थापना केलेल्या सहकारी ग्राहक भांडाराच्या कामकाजाचे नियम केले. त्यालाच पुढे सहकारी तत्त्वांचा मान मिळाला. १८९५ साली आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना झाली. आणि जगातल्या सहकारी चळवळीच्या वैचारिक बैठकीत कालानुरूप बदल करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. अगदी अलीकडे, १९९५ मध्ये आपली शताब्दी साजरी करताना त्यांनी सहकारी चळवळीची पुनर्रचित सात तत्त्वे घोषित केली ती अशी -

(१) खुले व खुशीचे सभासदत्व (२) सभासदांचे लोकशाही नियंत्रण (३) सभासदांचा आर्थिक सहभाग (४) स्वायतत्ता आणि स्वातंत्र्य (५) शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती (६) सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार्य (७) सामाजिक संवेदना.

जगातील ९० देश आय.सी.ए.चे (इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह असोसिएशन) सभासद आहेत. जगातील सहकारी संस्थांच्या व्यक्ती सभासदांची संख्या ९० कोटी आहे. भारताची सहकारी चळवळ तिची सभासद आहे व तिने या तत्त्वांचा स्वीकार केला आहे. या तत्त्वांना व्यापक अर्थ आहे. १९३७, १९६६ आणि आता १९९५ असा या तत्त्वांचा पुनर्रचनेचा प्रवास आहे व त्या त्या वेळी बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय संदर्भांचे प्रतिबिंब त्यात पडले आहे.

## (२) भारतातील सहकारी चळवळीची उद्दिष्टे, कार्य यात झालेले बदल

**(२.१)** ग्रामीण तसेच सहकारी भागात खाजगी सावकारीला पर्याय म्हणून सहकारी पतपुरवठा सोसायट्यांच्या चळवळीची सुरुवात १०० वर्षांपूर्वी झाली व तिला कायदेशीर अस्तित्व देण्यासाठी पहिला सहकारी कायदा १९०४ साली पास झाला. या १०० वर्षांत मूळच्या कायद्यात अनेकदा बदल झाले. आजच्या घडीस राज्यापेक्षा अधिक कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्थांच्या नियंत्रणांसाठी/नोंदणीसाठी केंद्र सरकारचा 'मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट' अस्तित्वात आहे. प्रत्येक राज्याचा स्वतंत्र सहकारी कायदा आहे. १९९५ नंतर स्वायत्त सहकारी संस्थांचे कायदे आत्मनिर्भर सहकारी संस्थांसाठी मंजूर करण्याचे धोरण काही राज्यांनी स्वीकारले. सहकारी संस्थांवरील शासकीय नियंत्रणांचे बदलते स्वरूप त्यातून दिसते.

**(२.२)** सहकारी पतपुरवठ्याच्या चळवळीत शंभर वर्षांत अनेक बदल झाले. १९५४ साली गोरवाला समितीने ही चळवळ अयशस्वी झाल्याचा अभिप्राय दिला व देशाची गरज म्हणून तिच्या वाढीसाठी मूलमंत्रही दिला. त्याचा परिणाम आज पन्नास वर्षांनंतर दिसतो आहे. ग्रामीण भागातील शेती पतपुरवठा संस्था व त्यांच्या जिल्हा व राज्य स्तरावरील बँका, शहरी भागांतील नागरी सहकारी बँका व नागरी पतपुरवठा संस्था यांचे जाळे, त्यांचे कामकाज व त्यांचा व्याप, व्याप्ती कौतुकास्पद नाही असे कोण म्हणेल. परदेशी बँका, खाजगी बँका आणि राष्ट्रीकृत बँका यांच्याशी स्पर्धा करीत, परिस्थितीशी मिळतेजुळते घेत, आधुनिकीकरणाचा अंगिकार करीत त्या पतपुरवठ्याच्या चळवळीच्या बदलत्या संदर्भाशी संघर्ष करीत आहेत. त्यांचे यशापयश काळच ठरवील. पण त्यांच्यात यशस्वी होण्याचे गुण नक्की आहेत.

(२.३) जगाच्या पाठीवर भारत हा असा एक देश आहे की, जेथल्या सहकारी चळवळीने विविध प्रकारच्या आर्थिक क्षेत्रांत पदार्पण केले व कमी-अधिक यश मिळविले. शेतीमालाच्या विपणनामध्ये (मार्केटिंग) अपयश आले तर शेतीमाल प्रक्रियेत

- साखर कारखानदारीत संमिश्र यश आले. शेतीस पूरक व्यवसायाने व दुधाच्या व्यवसायाने देशात इतिहास घडविला पण ग्रामीण कारागीर, शेतमजूर, बलुतेदार यांच्या संस्थांनी मूळ धरले नाही. सामाजिक मागासलेल्या/महिलांच्या संस्थांची कमी-अधिक तीच अवस्था. पण कोणत्याही नव्या आर्थिक उपक्रमाला आजही पहिला पर्याय म्हणून सहकारी संस्थाच पुढे येते. महिलांच्या अल्पबचत गटांची वाढती संख्या व त्यातही महिलांचा वाढता सहभाग हे त्याचेच द्योतक आहे. शहरी आणि ग्रामीण भागातही सहकारी गृहरचना संस्थांचे कार्य वादातीत आहे. बांधकाम व्यावसायिकांमुळे ते झाकोळले तरीही केवळ शासकीय अर्थ व धोरण सहाय्यावर अवलंबून राहिलेले काही सहकारी प्रयोग शासनाच्या तत्संबंधीच्या बदलत्या धोरणाच्या बळी ठरल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. पण पेरलेले सर्वच बी उगवत नाही, उगवलेले सर्वच तग धरत नाही व तग धरलेल्यापैकी काहींनाच फलधारणा होते हा निसर्गाचा नियम येथेही लागू आहे, हे क़बूल करण्यात हरकत नसावी.

**(३) बदलत्या आर्थिक धोरणाचे बदलते परिणाम**

**(३.१)** देशाचे आर्थिक धोरण ठरविण्याचा अधिकार राज्यकर्त्यांचा. पहिली ४०-४५ वर्षे देशात परकीय सत्ता होती व या देशाचे आर्थिक धोरण ठरविण्याचा त्यांचा अधिकारही होता. त्यानंतर स्वातंत्र्य मिळाले आणि सुरुवातीची ४०-४५ वर्षे देशात काँग्रेस पक्षाचेच राज्य होते. १९९१ मध्ये काँग्रेसनेच आपले आर्थिक धोरण बदलले व पुढे बारा-तेरा वर्षांत त्याची गती वाढली, पण दिशा बहुधा तीच राहिली. ९८ टक्के सहकारी संस्था आर्थिक व्यवसाय करणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे देशाच्या आर्थिक धोरणाचा त्यांच्यावर परिणाम होणे अपरिहार्य होते. तेव्हाच्या काळात, हातचे राखून मदत करण्याचे ब्रिटिशांचे धोरण, तर काँग्रेसचे भरभरून सहाय्याचे धोरण व त्यातील शासकीय हस्तक्षेप आणि आता मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणात 'तुमच्या बळावर तुम्हाला उभे राहता येत असेल तर राहा अन्यथा...' अशा बदलत्या धोरणांमध्ये सहकारी चळवळ आपले अस्तित्व टिकवून आहे. केवळ शासकीय साहाय्यावरच सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या या संस्थांची आजची अवस्था नामधारी आहे, पण, 'आम्हास तुमचे सहाय्य आणि हस्तक्षेप दोन्ही नको' म्हणणाऱ्या या संस्थांचे प्रवाहात पोहणे चालू आहे. कधी-कधी नाका-तोंडात पाणी जाते, पण बुडून मेल्याची उदाहरणे कमीच. यावर बरेच काही लिहिता-बोलता येईल. जगात ९० देशांत सहकारी चळवळ आहे आणि ९० कोटी लोक तिचे सभासद आहेत. यापैकी बहुतांश देशात मुक्त

अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे भारताच्या सहकारी चळवळीला स्पर्धेची सवय होईल असे म्हणायला हरकत नसावी. भारतात आज सुमारे ५ लाख सहकारी सोसायट्या आहेत, त्यांची सभासद संख्या २४ कोटी आहे व त्यांचे खेळते भांडवल कोट्यवधी रुपयांचे आहे. एवढे वजनदार तारू लगेचच बुडणार नाही.

**(३.२)** अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण, मुक्त बाजारपेठ, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, एक ना अनेक बाबी. शेवटी या बाबतच्या शासकीय धोरणाबरहुकूम प्रवास करणे एवढेच सहकारी संस्थेच्या हाती आहे.

**(३.३)** मात्र आधुनिक व्यवस्थापन शास्त्राचा, तंत्राचा अंगिकार करणे व आपली अर्थक्षमता व तंत्रक्षमता वाढविणे (इकॉनॉमिक व्हायबिलिटी व टेक्निकल फिजिबिलिटी) हा सहकारी चळवळीच्या बदलत्या संदर्भांचा कळीचा मुद्दा राहील.

**(४) सहकारी चळवळीचे नेतृत्व - पक्षीय, जातीपातीचे व घराण्याचे राजकारणः-**

**(४.१)** जगांतल्या सहकारी चळवळीच्या प्रवर्तकांनी (१८४४-रॉजडेल, 'सहकारी चळवळीने राजकीय व धार्मिक तटस्थता पाळली पाहिजे' असे म्हटले. पण १९३७ सालच्या आय.सी.ए.ने पुनर्रचीत केलेल्या तत्त्वांतून ते कमी केले. सहकार म्हणजे अर्थकारण व अर्थकारण आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू, त्यामुळे राजकीय तटस्थता केवळ असंभव. राजकीय विचार आणि राजकारण यात मात्र फारकत केली पाहिजे. सहकारी संस्थांच्या दैनंदिन कारभारात राजकीय हस्तक्षेप असता कामा नये या विचारानेच डॉ. धनंजयराव गाडगीळ म्हणत असत की, 'राजकीय कार्यकर्त्यांनी सहकारी संस्थेमध्ये येताना आपले राजकारणाचे जोडे बाहेर काढून ठेवले पाहिजेत.' प्रत्यक्षात विचार नि आचार यात बरेच अंतर असते. सहकारी नेतृत्वाच्या गुणवत्तेबद्दलही बरेच काही बोलता/लिहिता येईल. नुसती वैकुंठभाई, गाडगीळ, कर्वे, वसंतदादा पाटील यांची नावे घेऊन कसे भागेल ? सर्व प्रकारचे राजकारण सहकारात असू नये, पण जे सर्व क्षेत्रांत घडले त्यापासून सहकारी क्षेत्र वेगळे कसे राहील ?

**(५) प्रशासकीय व्यवस्थापन**

**(५.१)** व्यवस्थापन शास्त्र विकसित झाले आहे. राजकीय हस्तक्षेपापासून त्याला अलगद बाजूला केले पाहिजे. स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर त्याला पर्याय नाही.

## चर्चेचा गोषवारा

सहकारी चळवळ ही आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी सुरू झाली असून जागतिकीकरणाच्या व खाजगीकरणाच्या गदारोळातही तिला पर्याय उपलब्ध झालेला नाही. या गटाला आजही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बँका किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या इतर संस्थांपेक्षा सहकारी बँका वा संस्थाच जवळच्या वाटतात, याचाच अर्थ सहकारक्षेत्राची गरज आजही आहे. पण खुल्या आर्थिक धोरणामुळे सहकार क्षेत्र सध्या दुर्लक्षित झाले आहे.

पूर्वी (१९५५ नंतर) विविध सहकारी संस्था उभ्या राहण्यासाठी सरकारने भरघोस प्रयत्न केले पण त्यामुळे सहकारी क्षेत्राला कुबड्या घेऊन चालण्याची सवय लागली. मग सहकार क्षेत्रात राजकीय हितसंबंधांना फार महत्त्व आले, तसेच राजकारणासाठी सहकारक्षेत्राचा उपयोग करून घेण्यात आला. त्यात भ्रष्टाचारही वाढला आणि सहकारात घराणेशाही सुरू झाली आणि हळूहळू या संस्था 'नाही रे' गटाच्या राहिल्या नाहीत. या काळात व १९९१ नंतर आर्थिक सुधारणांना वेग आला त्या काळात, सहकारी चळवळीकडे सरकारनेही फारसे लक्ष दिले नाही आणि त्या टिकण्यासाठी वा वाढण्यासाठी इतर पातळ्यांवरूनही ठोस असे प्रयत्न झाले नाहीत. बदलत्या काळाचा वेध घेऊन सहकारक्षेत्रात आणि त्यासंबंधीच्या कायद्यांमध्ये कोणकोणते बदल करण्याची गरज आहे, याचा विचार करण्यात आला नाही. यातच सहकारक्षेत्रातील दूध उत्पादक संघ वा संस्था वगळता इतर क्षेत्रांत सहकाराला मोठे यश मिळाले, असे घडले नाही. काही उद्योग सहकारी क्षेत्रांतून बाजूला काढण्याची गरज आहे किंवा कसे याचा विचार व्हावा, असेही सुचविण्यात आले. सहकारी संस्था या हळूहळू जॉईंट स्टॉक कंपन्यांसारखे काम करू लागल्या आणि त्या 'नाही रे' गटापासून दूर जाऊ लागल्या. यामुळे कदाचित सहकाराचे तत्त्व पुढे नेणारे स्वयंसाहाय्य गट (सेल्फ हेल्प ग्रुप्स्) १९९० च्या दशकात पुढे आले. त्याचा उपयोग (कर्ज घेणारांसाठी व्याजदर कमी असणे, इत्यादी.) जर जास्त होत असेल तर सहकारी चळवळींनी कुठे बदलले पाहिजे, याचा विचार करण्याची गरज आहे. विशेषतः नवीन तंत्रज्ञान, नवीन व्यवस्थापन यादृष्टीने कार्यक्षम होण्याची गरज आहे.

सहकाराचे मूळ तत्त्व चांगलेच आहे. आर्थिक क्षेत्राशिवाय इतर क्षेत्रांतही सहकाराची गरज जाणवते आहे. तेव्हा सहकाराचा विचार कसा टिकेल व वाढेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असेही मत मांडण्यात आले. ■■



# शांततेच्या पाऊलखुणा

## जागतिक शांततेसाठी स्त्रियांचे आंतरराष्ट्रीय अधिवेशन !

इराकवर युद्धाचे ढग जमू लागले होते. एकीकडे, अमेरिकेत संयुक्त राष्ट्रसंघासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना दूर सारून युद्धाची तयारी चालू होती तर, दुसरीकडे स्वित्झर्लंड येथे, राष्ट्रसंघाने जागतिक शांततेसाठी जगभरातील स्त्रियांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण जगातील विविध धर्मांमधील आध्यात्मिक व औद्योगिक क्षेत्रांतील काही निवडक स्त्रिया, जागतिक शांतता कशी राखता येईल, याचा विचार करण्यासाठी येथे एकत्र आल्या होत्या. जागतिक शांततेसाठी, जागतिक पातळीवर फक्त स्त्रियांचे अधिवेशन, हे जगाच्या इतिहासात प्रथमच घडत होते. पंचाहत्तरपेक्षा जास्त देशांमधील आणि पाचशेपेक्षा जास्त स्त्रिया या अधिवेशनाला उपस्थित होत्या.

शस्त्रास्त्रे आणि स्वार्थ यांनी भरलेल्या जगात युद्धे होऊ नयेत यासाठी, उच्च मानवी मूल्यांना महत्त्व देण्यात यायला पाहिजे, आणि हे करण्यासाठी विविध धर्मांमधील आध्यात्मिक नेत्यांचे विचार जाणून घेतले पाहिजे, या उद्देशाने १९९९ मध्ये राष्ट्रसंघाचे सचिव कोफी अन्नान यांनी एका विशेष सभेचे आयोजन केले होते. या विशेष सभेत ८५ टक्के पेक्षाही जास्त पुरूष उपस्थित होते; आणि कोफी अन्नान यांचे मत असे होते की, जगाचे भविष्य स्त्रियांवर अवलंबून राहणार आहे. त्या सभेतील कमतरता भरून काढण्यासाठी स्त्रियांचे हे विशेष अधिवेशन भरले होते.

या अधिवेशनात ख्रिश्चन, मुस्लिम, ज्यू, बौद्ध आणि हिंदू अशा धर्मातील आध्यात्मिक नेत्या उपस्थित होत्या. विविध धर्मांचा तो जणू एक महासागरच होता. सर्वसंस्कृतीसमभाव, सर्वधर्मसमभाव, सर्वदेशसमभाव असे वातावरण येथे होते. उपस्थितांविषयी आदर दिसून येत होता. युद्ध नकोच यावर सर्वांचे एकमत होते, कोणत्याही युद्धाचा सर्वाधिक वाईट परिणाम हा स्त्रियांना भोगावा लागतो, हेही सर्वांना मान्य होते. या गंभीर चर्चा हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय होताच; शिवाय सर्वमान्य प्रार्थना आणि संपूर्ण शाकाहारी जेवण यांबरोबर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही

येथे करण्यात आले होते. जग कसे असावे, याचा आदर्शच जणू येथे उभा राहिला होता. प्रत्येकाने स्वार्थासाठीच जगायचे ठरविले तर कुणाचेच भले होणार नाही, तेव्हा वंशवाद, धर्मवाद इत्यादी दूर करून जगाचे कल्याण हेच एकमेव उद्दिष्ट सर्वांच्या मनात असावे असे येथे ठरले.

केवळ चर्चा नको तर प्रत्यक्ष कामालाच सुरुवात व्हावी म्हणूनही काही प्रयत्न करण्यात आले. अफगाणिस्तानमधील युद्धात स्त्रियांच्या झालेल्या नुकसानीबद्दल अफगाणिस्तान व अमेरिकेतील स्त्रियांनी आपले विचार मांडले. युद्ध होऊ नये यासाठी विचार-विनिमय करतानाच युद्धे भोगलेल्या स्त्रियांना व समाजाला शिक्षण, आरोग्य, व इतर विषयांत आर्थिक मदत देतानाच, धार्मिकदृष्ट्या म्हणजे मानसिक आधारही देण्याची गरज असून त्यासाठी कृती करण्याचे ठरले. ज्यू व पॅलेस्तिनी महिलांनी एकत्र येऊन आपण एकाच अब्राहमचे वंशज आहोत, हे मान्य करून 'आता युद्ध पुरे' या अर्थाचा 'अल् काफी' असा एक गट स्थापन केला. 'आपली मुले सैनिक किंवा अतिरेकी होणार नाहीत ही आपली जबाबदारी आहे,' हे त्यांनी स्पष्ट केले.

युद्धग्रस्त ठिकाणी जाऊन स्त्रियांनी स्त्रियांशी चर्चा करून काही मार्ग शोधण्याचा प्रयत्न करावा, यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर 'विमेन्स निगोशिएशन कॉर्प्स' अशी एक संघटना स्थापन करण्यात आली. युद्धग्रस्त ठिकाणी जाऊन नेमके काय झाले आहे ते तपासणे व नेमकी कोणकोणत्या प्रकारची मदत तेथे ताबडतोब पोचणे आवश्यक आहे हे पाहण्यासाठी स्त्रियांची सत्यशोधन समिती कार्यरत झाली. उद्योगात अग्रेसर असणाऱ्या स्त्रियांनी, औद्योगिक स्त्रियांचे मंडळ स्थापन करून अशा सर्व कामांसाठी व प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली. औद्योगिकतेतून शांतता व विकास करण्याचे या मंडळाचे उद्दिष्ट ठरले.

पाकिस्तानातील मर्जिस झैदी या पत्रकार स्त्रीने यावेळी असे म्हटले की, 'एखाद्या संस्कृतीत कुटल्यातरी टप्प्यावर शोषण व भेदभावाची सुरूवात होते आणि त्याला धर्माचा रंग दिला जातो.' राष्ट्रसंघाच्या शांततेच्या प्रत्येक कार्यात सहभागी व्हायचे असे येथे ठरविण्यात आले. अधिवेशनांच्या परंपरेप्रमाणे येथे उपस्थित असलेल्या सर्व धर्मांच्या स्त्री प्रतिनिधींनी काही ठरावही मंजूर केले; फक्त एक मोठा फरक असा होता की युद्धांच्या शक्यता कमी व्हाव्यात म्हणून हे ठराव नव्हते, तर शांतता प्रस्थापित व्हावी, म्हणून हे ठराव होते व त्यानुसार योजना कार्यान्वित झाल्या होत्या.

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

## जगाच्या पाठीवर...
### (इस्लामिक बँकिंग)

## पाकिस्तानात इस्लामिक बँकेची जोमाने वाढ

इस्लाम धर्माच्या तत्त्वावर आधारित म्हणजे 'व्याजरहित बँक' ही संकल्पना व्यवहारात आणण्याचे प्रयत्न अनेक देशांमध्ये होत असून (पाहा - अर्थबोधपत्रिका, मार्च २००४) पाकिस्तानही त्याला अपवाद नाही. 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान'चे गव्हर्नर डॉ. इशरत हुसैन यांनी अलीकडेच (मार्च २००४) असे स्पष्ट केले आहे की, पाकिस्तानमधील इस्लामिक बँकिंगच्या वाढीचा वार्षिक दर १५ टक्के आहे. पाकिस्तानमधील 'खैबर बँके'चे रूपांतर 'इस्लामिक बँके'त करण्यात आले असून, ते इतर बँकांसाठी एक नमुना ठरू शकेल, असेही त्यांनी म्हटले आहे. 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान'ने डॉ. महमूद अहमद गाझी यांच्या अध्यक्षतेखाली 'शरिया बोर्ड'ची स्थापना केली असून, त्याद्वारे 'व्याजरहित इस्लामिक बँकिंग'ची संकल्पना पाकिस्तानमध्ये सर्वत्र पोचविण्यात येणार आहे. देशांतर्गत, प्रांतीय अर्थव्यवस्थेला यामुळे आधार मिळण्याची शक्यता आहे.

बहारिन व मलेशिया येथील, इस्लामिक बँकिंगच्या क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासकांची मदत पाकिस्तानने घेतली आहे. पाकिस्तानमधील इतरही काही बँकांनी इस्लामिक बँकेकडे आपला कल दर्शविला असून तशी परवानगी 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान'कडे मागितली आहे. इस्लामिक बँकेची स्थापना करताना काही अडचणी येतात, कारण, याचा अभ्यास केलेली तज्ज्ञ मंडळी चटकन उपलब्ध होतातच असे नाही. पण ही परिस्थिती बदलण्यासाठी विद्यापीठांमधून इस्लामिक बँकेचे अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. इस्लाम धर्मात व्याजाला (रिबा) मंजूरी देण्यात न आल्याने, पाकिस्तानातील अनेक उद्योजक आधुनिक पद्धतीने कामकाज करणाऱ्या बँकांमध्ये आपले पैसे ठेवण्यास उत्सुक नसतात; मात्र असे व्यापारी व्याजरहित इस्लामिक बँकेच्या कामकाजात सहभागी होण्यास तयार असतात. त्यामुळे आता येथे इस्लामिक बँकिंगच्या वाढीला वाव आहे, असे तज्ज्ञ म्हणतात. ■■

## थायलंडमध्येही इस्लामिक बँकिंग

इस्लामिक बँकिंगकडे थायलंडमधील अनेक नागरिक आकर्षित होत असून अलीकडेच या प्रकारच्या बँकेची सोंगख्ला येथे सातवी शाखा उघडण्यात आली. तेव्हा,

पहिल्याच दिवशी दोन हजारावर ग्राहकांनी तेथे खाती उघडली. या भागात ४० टक्के नागरिक मुस्लिम असल्याने बँकेच्या ठेवीत लवकरच फार मोठी वाढ होईल, असा अंदाज आहे. इस्लामिक बँक ऑफ थायलंड ही बँक थायलंडच्या सरकारतर्फे चालविण्यात येते आणि अलीकडेच स्थापन झालेल्या या बँकेकडे ७० कोटी बाथ (थायलंडचे चलन), म्हणजे १८ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, एवढ्या ठेवी जमा झाल्या आहेत. ■■

## इस्लामिक बँकेसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था

बहारिन येथे स्थापन झालेली, 'जनरल कौन्सिल फॉर इस्लामिक बँक्स अँड फायनान्शियल इन्स्टिट्यूशन्स' (GCIBFI) ही संस्था, इस्लामिक बँकिंगच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर नावाजलेली व स्वायत्त आणि नफा न घेणारी अशी असून या संस्थेने आणि मलेशिया येथील 'कोलेज युनिव्हर्सिटी इस्लाम मलेशिया' (KUIM) या शैक्षणिक संस्थेने परस्पर सहकार्य वाढविण्याचा करार अलीकडेच केला आहे. मलेशियातील विद्यार्थ्यांना इस्लामिक बँकेच्या व्यवहारांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे व त्यांना यासंबंधीचे प्रशिक्षण घेता यावे यासाठी हे सहकार्य विशेषेकरून करण्यात येणार आहे. इस्लामिक बँकिंगच्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींची चर्चा, परिसंवाद असे काही घडवून आणण्याबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रकारचे वैचारिक प्रश्न निर्माण झाल्यासही या दोन संस्था एकत्र येऊन कार्य करतील असेही ठरले आहे. ■■

## शोषणरहित नवी अर्थव्यवस्था भारतातही असावी

भारताने सध्याची अस्तित्वात असलेली शोषण करणारी अर्थव्यवस्था मोडीत काढून मानवी संबंधांना महत्त्व देणारी, शोषणरहित नवी अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मत मुस्लिम समाजात व्यक्त करण्यात आले आहे. पाकिस्तान व बांगलादेश या भारताच्या शेजारी राष्ट्रांबरोबर व्यापारी संबंध वाढविण्याचा प्रयत्न भारत जर सार्कच्या माध्यमातून करणार असेल तर, भारताने आंतरराष्ट्रीय बँकिंगला पर्याय असणाऱ्या मार्गांचा विचार केला पाहिजे. नव्या अर्थरचनेसाठी भारताने आधी देशातील नागरिकांना व्याजाच्या कचाट्यातून मुक्त केले पाहिजे. मग इतर क्षेत्रांपर्यंत हळूहळू नव्या सुधारणा पोचविल्या पाहिजेत, असे नमूद करण्यात आले आहे. इस्लामने मानवी संबंधांना महत्त्व दिले आहे, असे म्हणून यासंबंधी अप्रत्यक्षपणे इस्लामिक बँकेच्या व्यवहाराकडे बोट दर्शविण्यात आले आहे. ■■

*(संदर्भ - इंटरनेट)*


**कालप्रवाहात......**

# भारतात पसरले दूरध्वनीचे जाळे

दूरसंचार सेवा ही आता एक अत्यावश्यक सेवा झाली आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे तर याचे महत्त्व आणखी वाढले आहे. भारतात या क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक ठिकाणी दूरध्वनी सेवा उपलब्ध होत आहे. दूरध्वनींची घनता (Tele-density) येथे वाढते आहे. म्हणजे १९९६-९७ या वर्षी, दर शंभर व्यक्तींमागे ०.३ इतकी दूरध्वनींची संख्या वाढली, तर आता म्हणजे २००२ साली २००१ च्या मानाने दर शंभर व्यक्तींमागे ०.६ एवढी संख्या एका वर्षात वाढली आहे.

भारतातील दूरध्वनींची घनता **(Tele-density in India )**

(दर शंभरजणांमागे असलेले टेलिफोन्सचे प्रमाण )




*(संदर्भ - दूरसंचार व माहिती मंत्रालय, वार्षिक अहवाल, इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

## अर्थकारणाच्या प्रत्येक चळवळीत सक्रीय सहभागी

## स्तंभयोरुभयोंमध्ये दिपमाला विराजते
## महाराष्ट्रधिकोषस्य मुद्रेयं लोकमङ्गला

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)

: केंद्रीय कार्यालय :
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर,
पुणे – 411 005.
Web : www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेविषयी -

*(डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीप्रणीत आणि नवीमुंबई शैक्षणिक आणि सामाजिक समिती यांच्या द्वारे वाशी येथे अकरावे विचारवेध संमेलन २६ ते २८ डिसेंबर २००३ या काळात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रमेश पानसे यांचे 'समकालीन शिक्षण: वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर अध्यक्षीय भाषण झाले. त्या भाषणातील एक मुद्दा वैद्यकीय शिक्षण व्यवस्थेचा वेगळ्या मार्गाने विचार करणारा होता. हा वेगळा मार्ग अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांपर्यंत पुरवणीद्वारे पोचवीत आहोत. - संपादक)*

भारतात आणि महाराष्ट्रातही, एकीकडे शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार होत असताना, आणि त्यातील प्रत्येक जण आज अस्तित्वात असलेल्या शिक्षणाच्या मांडवाखालून जात असूनही, शिक्षणाविषयी त्याने काढलेले सर्वसामान्य उद्‌गार हे असमाधानाचेच असतात. हा सार्वत्रिकरीत्या येणारा अनुभव आहे. हे असमाधान शाळेत लहानपणापासून मिळणाऱ्या अनुभवांबद्दलचे असेल किंवा ज्या स्तरावरचे परीक्षेतील यश मिळालेले असेल त्या यशाबद्दलचे असेल. किंवा मिळालेल्या नोकरीत वा करीत असलेल्या व्यवसायात, घेतलेले शिक्षण फारसे उपयोगी ठरत नसल्याबद्दलची ती खंत असेल. रोज दैनंदिन व्यवहार सुलभतेने व्हावेत यासाठी लागणारी नागरिकत्वाची बेगमीसुद्धा, भलेमोठे घेतलेले शिक्षण देत नाही किंवा अर्थकारण-राजकारण-समाजकारण यांतील व्यवहारांमध्ये लागणारी किमान नैतिकताही शिक्षण निर्माण करीत नाही; या गोष्टी शिक्षणाकडे शंकास्पद दृष्टीने पाहण्यास उद्युक्त करीत आहेत. मला तर एकूण शिक्षणव्यवस्थेबद्दल जाणवणारे असमाधान आणखीही एक प्रबळ कारणामुळे आहे. ते आहे प्रत्यक्ष शिक्षणव्यवस्थेत उगाचच भरडले जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींबद्दल. एक अत्यंत कमकुवत अशा, पण समाजातील सर्वच घटकांनी कृत्रिमरीत्या फार उच्चस्थानी नेऊन ठेवलेल्या परीक्षा नामक ध्येयासाठी झगडताना, विद्यार्थ्यांच्या तन-मनांची नि ऐन उमेदीच्या काळातील वेळाची होणारी परवड, मन अस्वस्थ करीत असते. या परीक्षांनी,

एकीकडे, ज्या जीवनाची उभारणी व्हायची त्या ज्ञानाचे क्षेत्रच संकुचित करून ठेवले आहे. तर दुसरीकडे, परीक्षांच्या यशात आयुष्याची इतिकर्तव्यता मानून भ्रामक स्वप्नांमध्ये विद्यार्थ्यांना अडकवले आहे. परिणामतः एकीकडे, त्यांच्या स्वतःची स्वतंत्र विचारशक्तीची वेल खुंटत जाते तर दुसरीकडे, परावलंबित्वाचा वृक्ष त्यांच्या वाढत्या वयाबरोबर फोफावत जातो. समाजधारणेबद्दल विलक्षण उदासीन आणि आत्मकेंद्रित असा एक प्रकारचा नवा सुशिक्षितांचा वर्ग, या शिक्षणव्यवस्थेतून घडवला जातोय. आणि हे लक्षण व्यक्तिगत पातळीवर अन्यायाचे तसेच, सामाजिक पातळीवर ते गुलामांचा वर्ग पोसणारे आहे.

व्यक्तिगत नि सामाजिक जीवन प्रगल्भ करणारे असे शिक्षण हवे असेल तर स्वतंत्रपणे विचार करू शकणारी, सामाजिक अन्यायांविरूद्ध संघर्ष उभा करण्याची ताकद असणारी आणि अनाठायी धार्मिक, वांशिक किंवा राजकीय हिंसाचाराला विवेकाने थोपवू शकणारी अशी सुजाण नागरिकांची पिढी निर्माण करावी लागेल. परंतु, अशा पिढीची निर्मिती करण्याची ताकद या आजच्या शिक्षणव्यवस्थेत नाही हे कळूनसुद्धा, असलेले शिक्षण नाकारण्यापेक्षा ते हाकारण्यातच आणि मूलभूत परिवर्तन करण्यापेक्षा त्यात वर्गीय सोयी करण्यातच आपण अडकलो आहोत. शिक्षणव्यवस्थेविषयी घोर असमाधान तर आहे पण, तरीही ते धरून तर ठेवले पाहिजे, अशा पेचात आपण अडकलो आहोत. हा पेच सुटणार कसा ?

शास्त्रीय शोधांच्या क्षेत्रात बराच काळ वावरल्यानंतर अल्बर्ट आईन्स्टीनने म्हटले आहे, एखादी समस्या ज्या तऱ्हेच्या जाणीवेतून निर्माण झालेली असते, त्याच प्रकारच्या जाणीवांनी त्या समस्येची सोडवणूक होत नाही. तिच्या सोडवणुकीसाठी आपण जगाकडे नव्या दृष्टीने पाहायला शिकले पाहिजे. आपल्यालाही प्रश्नाच्या अस्तित्वात असलेल्या चौकटीबाहेर जाऊन तार्किक विचार करावा लागेल, असा वेगळ्या दिशेने विचार कसा करता येईल, याचे एक उदाहरण देतो.

### वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेचा नवा विचार

वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रवेशाच्या संदर्भात, लाखो रुपयांच्या शुल्काचा एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. शुल्क कमी करणे हे महाविद्यालयांना परवडत नाही, तर वाढलेले शुल्क प्रवेशेच्छूंना परवडत नाही. न्यायालयाने मध्यस्थी करून किंवा सुवर्णमध्य काढून हा प्रश्न सुटणार नाही. अनेकांना डॉक्टर व्हायचे आहे. त्यासाठी शंभर टक्क्यांच्या जवळपास परीक्षांतून गुण मिळविण्याचा प्रयत्न करणारी

आणि प्रत्यक्षात असे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, आणि ती ज्यांच्यासाठी स्पर्धा करताहेत त्या जागांची संख्या मर्यादित आहे, पुरवठा कमी -मागणी जास्त म्हणून वाढती किंमत; असा निर्माण झालेला पेच, महाविद्यालयांमधील पाच-पन्नास जागा वाढवून सुटणार नाही. देशात, विशेषतः खेड्या-पाड्यांमध्ये वैद्यकीय सेवा अपुरी, अशी एकीकडे स्थिती आणि अशी सेवा देतील अशा डॉक्टरांची संख्या अपुरी अशी दुसरीकडे स्थिती. अशा वेळी डॉक्टरकीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी एखादे वर्ष खेड्यांत काम करण्याची सक्ती करून हा वैद्यकीय सेवा पुरवठ्याचा प्रश्नही सुटणारा नाही.

वैद्यकीय शिक्षणाच्या आणि व्यवसायाच्या बाबतीत एक विशिष्ट चौकट निर्माण झाली आहे. ही चौकट मोडून काढली तर त्यातील बरेचसे प्रश्न गळून पडतील. आज वैद्यकीय व्यवसाय, खूप पैसे देणारा व्यवसाय ठरलेला आहे. पैशांमुळे त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पैसा आणि प्रतिष्ठा यांसाठी या व्यवसायात शिरण्याची इच्छा असलेले अक्षरशः हजारो-लाखो लोक आहेत, दोन-तीन वर्षांच्या बालकाला डॉक्टर करण्याची स्वप्ने पाहणारे अनेक पालक आहेत. या सगळ्यांना हे माहीत आहे की डॉक्टर होण्याची संधी सगळ्यांना मिळत नसते. कारण, महाविद्यालयांमधून असलेल्या जागा मर्यादित आहेत. अशावेळी निवड केली जाते; आणि निवडीचा सोपा, सोयीस्कर नि समर्थन करता येईल असा एकमेव निकष आहे तो म्हणजे प्रवेश परीक्षांमधील गुण. त्यामुळे परीक्षांतील गुणांचा ध्यास विद्यार्थी नि पालक घेत आहेत.

आपल्याकडे, परीक्षेत खूप गुण मिळविणाराला हुशार समजले जाते. (भ्रम क्र.१) हुशार मुलेच डॉक्टर होऊ शकतात. पर्यायाने डॉक्टर होण्यासाठी फार तीव्र हुशारी लागते. (भ्रम क्र. २) वैद्यकीय शिक्षणासाठी निवड करताना, हुशारींचा निकष हाच एकमेव निकष असू शकतो. (भ्रम.क्र.३) डॉक्टरांचे कौशल्य (इतर अनेक लहान-मोठ्या व्यवसायातील कौशल्यापेक्षा) तुलनेने अधिक असते आणि म्हणून त्यासाठी ग्राहकांना मोठी किंमत मोजावी लागते. (भ्रम.क्र.४) समाजात, डॉक्टर होणे हेच सर्वात जास्त प्रतिष्ठेचे आहे. (भ्रम.क्र.५) आणि म्हणून डॉक्टर होणे म्हणजे जीवनात यशस्वी होणे होय. (भ्रम.क्र.६) वैद्यकीय व्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षण यांची व्यवहारात नि समाजमनात असलेली चौकट ही या विविध भ्रमांवर आधारलेली आहे. त्यामुळे हे भ्रम त्यांची अंतर्गत तार्किकता हेच जोवर आपले गृहीत असेल तोवर, प्रश्न सोडविण्याची आपली विचारपद्धती या चौकटीतच राहील, आणि मग, आईन्स्टीनने

म्हटल्याप्रमाणे, उत्तरांची दिशा आपल्या हाती येणार नाही. साहजिकच, प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी एकीकडे धाडसीपणे हे भ्रम दूर करावे लागतील, तर दुसरीकडे अधिक उंचावर, डोंगरावर उभे राहून हा संपूर्ण प्रश्न आपल्या दृष्टीच्या-विचाराच्या परिप्रेक्षात आणावा लागेल.

समाजाला पुरेशा प्रमाणात वैद्यकीय सेवा प्राप्त झाली पाहिजे ही पहिली सामाजिक गरज आहे. ती घराजवळ आणि परवडणाऱ्या दरांत मिळाली पाहिजे. आज समाजात, अनेकांना अशी सेवा पुरविण्याचा व्यवसाय करण्याची इच्छा आहे, म्हणजे डॉक्टर होण्याची इच्छा आहे. त्या प्रत्येकालाच डॉक्टर होण्याची संधी मिळाली पाहिजे. समाजात, कुटुंबातून ज्या ज्या स्तरांवरची आजारपणे असू शकतात, त्या त्या स्तरांवरची आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध करू शकण्यासाठी, इतर क्षेत्रातील शिक्षणाप्रमाणेच वेगवेगळ्या स्तरांवरचे वैद्यकीय शिक्षणाचे अभ्यासक्रम उपलब्ध करावे लागतील. इंजिनियरिंगच्या शिक्षणातही डिप्लोमा (पदविका) आणि डिग्री (पदवी) अशा दोन स्तरांवर शिक्षण घेण्याची सोय असते. किंवा, शिक्षणक्षेत्रातही विद्यापीठत शिक्षक होण्यासाठी एम.ए. (एम.एस.सी.) पी.एच.डी., महाविद्यालयांत शिकविण्यासाठी एम.ए., एम.फील., माध्यमिक शाळेसाठी बी.ए. आणि बी.एड., प्राथमिक सालेत शिकविण्यासाठी बारावी व डी.एड, आणि बालवाडीत शिकविण्यासाठी शालान्त परीक्षा व एक वर्षाचे प्रशिक्षण, अशा प्रकारची उतरंड असते. अशी उतरंड वैद्यकीय शिक्षणात आणणे सहज शक्य आहे आणि उपयुक्तही आहे. सुतारकाम, शिंपीकाम वगैरेप्रमाणेच आणि इतकेच वैद्यकीय व्यवसायाचे स्वरूप तांत्रिक आहे. विशिष्ट आजार, त्यांची ठराविक लक्षणे आणि त्यावर ठरून गेलेली औषधे माहीत झाली आणि सरावाने आजार समजण्याचे कौशल्य आले की पन्नास-साठ टक्के आजारांवर उपचार करण्याचे सामर्थ्य येऊशकते. त्यासाठी दहावी किंवा बारावी व एक वर्षाचा अभ्यासक्रम (सर्टिफिकेट कोर्स) पुरेसा ठरेल. त्यानंतरच्या वरवरच्या स्तरांसाठी आणि कौशल्यांसाठी प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधन पदवी अशा प्रकारे शिक्षण देणारी वैद्यकीय महाविद्यालये निर्माण करता येतील. शेकड्यांनी करता येतील. वेगवेगळ्या पातळ्यांवर हजारो डॉक्टर्स निर्माण होतील. आरोग्यसेवा सार्वत्रिक होतील. शिवाय रोजगाराच्या हजारो नव्या संधीही उपलब्ध होतील. विविध भ्रम दूर होतील. या प्रक्रियेतील स्पर्धा कमी होऊन विद्यार्थ्यांमधील नैराश्यही कमी होईल आणि समाजालाही ते उपयुक्त ठरेल. ■■

# निर्भयता

शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांतून शांतता, स्वास्थ्य लाभणे शक्य नाही असे अनेक विचारवंतांना आज वाटत आहे. शस्त्रास्त्रांच्या सुधारणेपेक्षा मनुष्यांत सुधारणा कशी घडवून आणता येईल याचाही ते विचार करीत आहेत. आजचे शिक्षण-शास्त्रज्ञ बालकांना कसलीच भीती दाखवू नका, असे जे सांगत आहेत त्यांच्या मुळाशी मनुष्य सुधारण्याचाच शुद्ध हेतू आहे. तेव्हा बालकांना भीती दाखवू नका याचा अर्थ आणखी स्वतःशी स्पष्ट करून घेण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

भीती न दाखवण्याचा एक उद्देश असा की आपले बालक मनाने निर्भय राहावे. भयाच्या पायावर उभारलेल्या म्हणून क्षणोक्षणी भेडसावणाऱ्या जगात त्याने निडर राहावे. कसल्याही डरकावणीला बळी पडू नये. भय भीतीच्या सिद्धान्ताचा एवढाच अर्थ करून काही लोक आपले कार्य साधू पाहतात. अशा लोकांना आपले मूल दुसऱ्या बालकांना भीती घालीत असेल तर ते आपल्या बालकाच्या दृष्टीने काही अपायकारक आहे असे न वाटता एक प्रकारचे भूषण वाटते. इतकेच नव्हे तर शास्ते म्हणून गाजलेल्या काही जातींत तर आपल्या बालकांनी दुसऱ्याला कसे धमकवावे, दुसऱ्यांच्या डरपोकपणाच्या स्वतः निर्भयपणे कसा जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा याचे रीतसर शिक्षण देण्यांत येते. मानवी समाजात जे कित्येक धटिंगण निर्माण होतात ते अशामुळे. दुसऱ्याच्या डरपोकपणावर जगावे हाच मुळी या धटिंगणांचा धंदा. हे धटिंगण ज्या समाजात उत्पन्न झाले आहेत त्याच समाजात दुबळी माणसेही उत्पन्न होत असल्यामुळे दोन्ही वर्ग एकमेकांना पोषक होऊन बसले आहेत. धटिंगणाला दुसरा धटिंगण भेटल्यावर दोघेही नरम पडतात हे दृष्य अनेकांच्या परिचयाचे आहे. बालकांना निर्भय ठेवा याचा अर्थ दुसऱ्याच्या भीरूतेवर जगणारे धटिंगण निर्माण करा असा संकुचित नाही. कारण त्यापासून खरोखर भयमुक्ति नाही. आपली बालके भयमुक्त ठेवावयाची असल्यास ती भित्री नकोत. त्याबरोबरच ती दुसऱ्यांना भेडसावणारी, दरडावणारी धटिंगण पण व्हायला नकोत. ती अंतर्बाह्य निर्भय पाहिजेत. पण याचा अर्थ भयाचे आपल्या जीवनात मुळीच स्थान नाही असाही नाही.

(ताराबाई मोडक, शिक्षणपत्रिका, जानेवारी १९३६ वरून ) ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक( 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकासचंद्र चित्रे ●मृणाल दत्तचौधरी ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**